
महाराष्ट्राचा हक्काचा आवाज
दैनिक बीड
# लोकनेता
Lokneta News - लोकनेता न्युज
मुख्य संपादक : ज्ञानेश्वर मुंढे
शनिवार ६ जून २०२६ | RNI-MAHMAR/2023/89402 | Email : dnyaneshmofficial@gmail.com | वर्ष : ०३ अंक : २८७ | किंमत २ रुपये | 7499615933




# अन्नपदार्थात भेसळ? एका कॉलवर तक्रार करा

## तुकाराम मुंढे करतील कारवाई अन्नभेसळ खोरांवर जोरदार कारवाई सुरु






महाराष्ट्रात अन्न भेसळीच्या विरोधात कर्तव्य कठोर अधिकारी तुकाराम मुंढे यांनी अन्न आणि औषध प्रशासन ( एफडीए ) आयुक्त म्हणून चार्ज घेताच कारवाईचा धडाका लावला आहे. त्यामुळे सर्वत्र अन्न पदार्थांत भेसळ करुन पैसे कमावण्यासाठी लोकांच्या जीवाशी कसे खेळले जात आहे याचे धक्कादायक पुरावे जनते समोर येऊ लागले आहेत. गेल्या सहा दिवसातच राज्यात २०३ हून अधिक ठिकाणी छापे टाकण्यात आले असून तब्बल १०२ भेसळखोरांना अटक करण्यात आली आहे. या ६८ दुकानांवर आणि हॉटेल्सवर कारवाई करण्यात येऊन त्यांना टाळे लावण्यात आले आहेत. अन्न आणि औषध प्रशासनाचे आयुक्त म्हणून आयएएस अधिकारी तुकाराम मुंढे यांनी कार्यभार हाती घेतला आहे. त्यानंतर त्यांनी एफडीचे आयुक्त म्हणून धडाकेबाज कारवाई केली आहे. प्रतिबंधित गुटखा, पानमसाले, दुध आणि पनीर, मिठाई, खवा यांची साठवणूक करणाऱ्या विरोधात मोठी कारवाई करण्यात येत आहे. तुकाराम मुंढे यांनी महाराष्ट्राचे एफडीए आयुक्त म्हणून पदभार स्वीकारल्यानंतर जनतेचे आरोग्य सुरक्षित राखण्यासाठी Safe Food, Safe Drugs, Safe Maharashtra असे ब्रीद आखत काम सुरु केले आहे.

### मोठ्या प्रमाणावर कारवाई सुरु

लोकांच्या आरोग्याशी खेळ करणाऱ्यांना कायद्यापासून लपता येणार नाही असा स्पष्ट इशारा तुकाराम मुंढे यांनी दिला आहे.आता कोणत्याही खाद्य पदार्थात जर भेसळी विषयीची तक्रार नागरिकांना करायची असेल तर त्यांना या तक्रारी थेट प्रशासनात पोहचता येणार आहे.यासाठी एफडीएने टोल – फ्री क्रमांक आणि ईमेल जाहीर केला आहे. या वर नागरिकांना त्यांची तक्रार करता येणार आहे. गेल्या काही महिन्यात अन्न आणि औषध प्रशासनाने कारवाई कमी केली होती, तसेच या खात्यावर चालढकल आणि लाचखोरीचे देखील आरोप झाले होते. या पार्श्वभूमीवर २५ मे रोजी तुकाराम मुंढे यांची नियुक्ती एफडीएचे आयुक्त म्हणून करण्यात आली आहे. २५ मे रोजी तुकाराम मुंढे यांनी पदभार स्वीकारल्यानंतर अन्न

### मुंबई-आग्रा महामार्गावर कारवाई

आयुक्त तुकाराम मुंढे यांच्या मार्गदर्शनाखाली ४ मे रोजी धुळे येथे मोठी कारवाई झाली. महाराष्ट्रात बंदी असलेल्या गुटखा आणि तंबाकूयुक्त पदार्थाच्या वाहतूक रोखत एफडीएने १८ लाख ५० हजाराचा अवैध गुटखा जप्त केला आहे. मुंबई – आग्रा महामार्गावर सापळा रचून ही कारवाई करण्यात आली. या प्रकरणात वाहन चालक सुरेश कुमारे गोवरिया ( राजस्थान ) याच्याविरोधात गुन्हा दाखल झाला आहे.




# बँकेच्या दिरंगाईविरोधात दिव्यांग उद्धव काळेंचे उपोषण; ३ महिन्यांत विमा देण्याचे लेखी आश्वासन

लोकनेता न्युज नेटवर्क
देगलूर ता / वंकलवार प्रभू

कामाजीवाडी (सुभाषनगर) येथील अपघातात जखमी झालेले दिव्यांग उद्धव काळे यांना बँक ऑफ महाराष्ट्रच्या दिरंगाईचा फटका बसला आहे. अपघात विम्याचा प्रस्ताव हेड ऑफिसमध्ये धुळखात पडल्याने, अखेर न्याय मिळवण्यासाठी काळे यांनी आपल्या लेकराबाळांसह देगलूर बँक शाखेसमोर आमरण उपोषण सुरू केले होते. शिवसेनेच्या मध्यस्थीनंतर आणि बँकेच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या लेखी आश्वासनानंतर हे उपोषण मागे घेण्यात आले.

बँकेच्या मनमानी कारभारावर संताप

विम्याचे हप्ते वेळेवर कापून घेणाऱ्या महाराष्ट्र ग्रामीण बँकेकडून क्लेम देण्याच्या नावाखाली ग्राहकांची मोठी हेळसांड केली जात आहे. हणेगाव परिसरात गेल्या दोन वर्षांपासून अपघात आणि मृत्यू झालेल्या अनेक विमाधारकांचे क्लेम प्रलंबित असल्याचा आरोप यावेळी करण्यात आला. बँकेच्या या मनमानी आणि वेळकाढू धोरणामुळे संतप्त झालेल्या उद्धव काळे यांनी थेट कुटुंबासह आंदोलनाचे हत्यार उपसले.

वरिष्ठ अधिकाऱ्यांची धाव, लेखी आश्वासन

आंदोलनाची तीव्रता पाहून बँकेचे वरिष्ठ अधिकारी मिश्रा साहेब यांनी देगलूर शाखेत धाव घेतली. त्यांनी "येत्या तीन महिन्यांत अपघाती विम्याची रक्कम मंजूर करून दिली जाईल," असे लेखी आश्वासन आंदोलनकर्त्यांना दिले. त्यानंतर शिवसेना पदाधिकाऱ्यांच्या हस्ते नारळपाणी देऊन उपोषण सोडवण्यात आले.



यावेळी शिवसेना उपजिल्हाप्रमुख महेश पाटील, देगलूर-बिलोली विधानसभा मतदारसंघ प्रमुख पांडुरंग पाटील थडके देगावकर, शिवसेना देगलूर शहरप्रमुख भगवान जाधव यांच्यासह देगलूर बँकेचे शाखाधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. बँकेने दिलेल्या वेळेत पैसे न दिल्यास पुन्हा तीव्र आंदोलनाचा इशारा शिवसेना व ग्रामस्थांनी दिला

# मुख्य सचिव राजेश अग्रवाल गडचिरोली दौऱ्यावर

विकासकामांचा आढावा, गावांना,भेटी आणि आत्मसमर्पित नक्षलवाद्यांशी संवाद साधणार

लोकनेता न्युज नेटवर्क
सेवा पवार
जिल्हा प्रतिनिधी गडचिरोली.

गडचिरोली, दि. 5 : राज्याचे मुख्य सचिव तथा गडचिरोली जिल्ह्याचे पालक सचिव राजेश अग्रवाल हे ६ व ७ जून २०२६ रोजी गडचिरोली जिल्ह्याच्या दौऱ्यावर येत असून, या दौऱ्यात ते गडचिरोली जिल्ह्यातील विविध विकासकामांचा आढावा घेणार आहेत. तसेच नक्षलविरोधी उपाययोजनांबाबत वरिष्ठ अधिकाऱ्यांची महत्त्वपूर्ण बैठक घेऊन आत्मसमर्पित नक्षलवाद्यांच्या पुनर्वसन प्रकल्पालाही भेट देणार आहेत.



दौरा कार्यक्रमानुसार मुख्य सचिव ६ जून रोजी सकाळी नागपूरहून गडचिरोलीकडे प्रस्थान करून जिल्ह्यातील विविध गावांना व विकासकामांच्या स्थळांना भेटी देणार आहेत. त्यानंतर त्यांचा गडचिरोली येथे मुक्काम राहणार आहे.

७ जून रोजी सकाळी १०.४५ वाजता जिल्हाधिकारी कार्यालयात नक्षलविरोधी कारवायांबाबत जिल्हास्तरीय व तालुकास्तरीय अधिकाऱ्यांसोबत विकासकामे, सुरक्षा उपाययोजना आणि विविध योजनांच्या अंमलबजावणीचा सविस्तर आढावा घेण्यात येणार आहे.

दुपारी वरिष्ठ अधिकाऱ्यांची अंतर्गत बैठक झाल्यानंतर मुख्य सचिव आत्मसमर्पित नक्षलवाद्यांच्या पुनर्वसनासाठी उभारण्यात आलेल्या नवजीवन वसाहतीला भेट देणार आहेत. येथे ते आत्मसमर्पित माजी नक्षलवाद्यांशी प्रत्यक्ष संवाद साधून पुनर्वसन उपक्रमांची माहिती घेणार आहेत.

सायं. ४.४५ वाजता मुख्य सचिव नागपूरकडे प्रस्थान करतील.

# जव्हारमधील आकरे ग्रामपंचायतीचे दोन ऐतिहासिक निर्णय;

शाळकरी विद्यार्थ्यांच्या पालकांना व एकअपत्यधारकांना घरपट्टी माफी

लोकनेता न्यूज नेटवर्क
पालघर - श्री तुषार भोईर

जव्हार - जव्हार तालुक्यातील अतिदुर्गम भागातील आकरे ग्रामपंचायतीने ग्रामविकास, शिक्षण आणि लोकसंख्या नियंत्रणाला प्रोत्साहन देण्यासाठी दोन महत्त्वपूर्ण निर्णय घेतले आहेत. २९ मे रोजी झालेल्या ग्रामसभेत हे निर्णय एकमताने मंजूर करण्यात आले असून परिसरात त्याची चर्चा सुरू आहे.

ग्रामसभेच्या निर्णयानुसार, जिल्हा परिषद शाळेत इयत्ता पहिली ते तिसरीमध्ये शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या पालकांना १०० टक्के घरपट्टी कर माफ करण्यात येणार आहे. जिल्हा परिषद शाळांमधील विद्यार्थीसंख्या घटू नये, शाळेचा पट कायम राहावा आणि ग्रामीण भागातील शासकीय शिक्षणाला चालना मिळावी, या उद्देशाने हा निर्णय घेण्यात आल्याचे ग्रामपंचायतीने स्पष्ट केले.

याशिवाय वाढत्या लोकसंख्येचा विचार करून कुटुंब नियोजनाला प्रोत्साहन देण्यासाठी आणखी एक महत्त्वाचा निर्णय घेण्यात आला आहे. ज्या पालकांनी एकाच अपत्यावर कुटुंब मर्यादित ठेवण्याचा निर्णय घेतला असेल, त्यांना संबंधित वर्षापासून पुढील दहा वर्षांसाठी घरपट्टी कर माफ करण्यात येणार आहे. शिक्षण संवर्धन आणि लोकसंख्या नियंत्रण या दोन्ही सामाजिक विषयांना प्रोत्साहन देणारे हे निर्णय ग्रामीण भागासाठी दिशादर्शक ठरू शकतात, अशी प्रतिक्रिया ग्रामस्थांकडून व्यक्त होत आहे. आकरे ग्रामपंचायतीचे सरपंच धिरज बंडू घुमल यांनी सांगितले की, "गावातील जिल्हा परिषद शाळा




सक्षम राहावी, विद्यार्थ्यांची संख्या वाढावी आणि लोकसंख्या नियंत्रणाबाबत जनजागृती व्हावी, या उद्देशाने ग्रामसभेत हे निर्णय घेण्यात आले आहेत."

ग्रामपंचायतीच्या या अभिनव उपक्रमाकडे आता तालुक्यासह जिल्ह्याचे लक्ष लागले असून, इतर ग्रामपंचायतींसाठीही तो आदर्श ठरण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

# हरेगाव गावच्या सुपुत्र्यची साप्रदाय क्षेत्रात गगन भरारी...



लोकनेता न्यूज नेटवर्क
जीवन जाधव औसा

हरेगाव गावचे सुपुत्र ह. भ. प नामदेव महाराज कोव्हाळे यांनी आळंदी येथे नामदेव महाराज वारकरी शिक्षण संस्थेच्या माध्यमातून अनेक विद्यार्थ्यांना सांप्रदायिक व धार्मिक शिक्षणाची आवड निर्माण केली. असून ग्रामीण भागातील अनेक बाल विद्यार्थ्यांना आपल्या संस्थेच्या माध्यमातून धार्मिक व सांप्रदायिक शिक्षण देत अनेक विद्यार्थी आपल्या संस्थेच्या माध्यमातून घडविण्याचे कार्य केलं आहे.. औसा तालुक्यातील हरेगाव गावचे ग्रामदैवत श्री संत श्रेष्ठ नामदेव महाराज देवस्थान हरेगाव यांच्या कृपा आशिर्वादाने, पारंपारिक पिढ्यानपिढ्या चालत असलेला घरचा सांप्रदायिक वारसा जपत आपल्या आई वडिलांच्या स्वप्नाला आकार देण्यासाठी आई.केशरबाई बाबुराव कोव्हाळे ,वडील.बाबुराव नामदेव कोव्हाळे यांच्या पुण्याईने, आळंदी येथे श्री संत श्रेष्ठ नामदेव महाराज वारकरी शिक्षण संस्था स्थापित करून चे ग्रामीण भागातील सर्वसामान्य कुटुंबातील विद्यार्थी असतील त्यांना धर्माचं व सांप्रदायाचे शिक्षण देण्याचं काम शिक्षण संस्थेच्या माध्यमातून गेली सहा ते सात वर्ष नामदेव महाराज करत आहेत ,गेले पाच,सहा वर्ष झाले ही संस्था गोर गरीबांच्या मुला मुलींना वारकरी शिक्षणासोबतच आध्यात्मिक शिक्षण देण्याचे काम करत आहे, आपल्या संस्थेचा एकच संकल्प आहे की. येणाऱ्या पुढच्या पिढीला सक्षम आणि सुसंस्कारित बनवून भजन, कीर्तन, प्रवचन, वारकरी संप्रदायाची सेवा,आई वडीलांची सेवा,गो मातेची सेवा,भारत मातेची सेवा, सह समाजातील इतर घटकांची सेवा करण्याची संधी व शिक्षण या संस्थेच्या माध्यमातून दिला जातो. आपल्या शिक्षणाचा फायदा सर्वसामान्यांच्या मुला-मुलींना व्हावा यासाठी या संस्थेच्या माध्यमातून अनेक मुला-मुलींना सांप्रदायाचे ज्ञान देत असताना वारकरी व कीर्तनकार सहगायक होण्याचे अनेक विद्यार्थ्यांचे स्वप्न पूर्ण झाला आहे. सर्वसामान्य कुटुंबातील मुलाना सुसंस्कारित घडविण्याचे काम आपली श्री संत नामदेव महाराज संस्था करत आहे. धावपळीच्या युगामध्ये मुलं मुली मोबाईल व व्यसनाच्या आहारी, जाऊन आपल जीवन अधोगती कडे नेत आहेत, वं व्यसनाच्या आहारी जाऊन,संसार उद्धवस्त होत आहे, या सर्व बाबींचा विचार डोळ्यासमोर ठेवून आपली वारकरी संस्था गेले पाच तें सहा वर्ष आळंदी या ठिकाणी कार्यरत आहे .या संस्थेचे संस्थापक अध्यक्ष हें एक गरीब कुटुंबातील सर्वसामान्य शेतकऱ्यांचा मुलगा असून, नामदेव महाराज यांना आई वडीलांनी लोकांची मोल मंजुरी करून शिक्षण दिले.आणि आपल्या आई-वडिलांच्या कष्टाची जाणीव ठेवून हरेगाव गावचे सुपुत्र श्री हरिभक्त पारायण, युवा किर्तनकार नामदेव महाराज कोव्हाळे यांनी आपल्या आई वडिलांच्या कष्टांची जाण ठेवून अहो रात्र कष्ट करून, शून्यातून विश्व निर्माण केले आहे. ज्या पद्धतीने आपण सर्वसामान्य कुटुंबातून शेतकऱ्यांच्या पोटी जन्म घेऊन सांप्रदायिक वारसा जपत असताना केलेला संघर्ष डोळ्यासमोर ठेवून आपण केलेला संघर्ष इतरांच्या वाटेला येऊ नये या विवेक सद्बुद्धीने श्री संत श्रेष्ठ नामदेव महाराज संस्थेची उभारणी करून सर्व समाजातील गोरगरीब शेतकऱ्यांच्या मुलामुलींना सांप्रदायाचे शिक्षण देणे हाच आमचा उद्देश व संकल्प असल्याचे यावेळी सांगितले 2 री तें 12 वी पर्यंतच्या मुला मुलींना शालेय शिक्षणाबरोबरच आध्यात्मिक शिक्षणाची सुवर्ण संधी प्रवेश देणे चालू आहे आजच आपल्या पाल्याचा प्रवेश निश्चित करा वे असं आव्हान करण्यात येते आहे.

# वऱ्हाडाच्या टेम्पोला कंटेनरची जोरदार धडक; दोन ठार, 19 जखमी...

लोकनेते न्यूज नेटवर्क
वैजापूर, प्रतिनिधी अर्जुन शिंदे

वैजापूर-गंगापूर मार्गावरील घायगाव शिवारात गुरुवारी (४ जून) दुपारी सुमारे तीन वाजेच्या सुमारास लग्नाचे वऱ्हाड घेऊन जाणाऱ्या टेम्पोला समोरून येणाऱ्या कंटेनरची जोरदार धडक बसल्याने भीषण अपघात झाला. या दुर्घटनेत दोन जणांचा मृत्यू झाला असून १९ जण जखमी झाले आहेत. जखमींपैकी तिघांची प्रकृती चिंताजनक असल्याची माहिती मिळाली आहे.

मृतांमध्ये ज्ञानेश्वर रुपचंद वाघ (वय २०) आणि अनिता वामन वाघ (वय ३५, दोघेही रा. पाटेगाव, ता. पैठण) यांचा समावेश आहे. ज्ञानेश्वर यांचा जागीच मृत्यू झाला, तर अनिता वाघ यांचा उपचारादरम्यान घाटी रुग्णालयात मृत्यू झाला.

मिळालेल्या माहितीनुसार, पाटेगाव येथील काशिनाथ ठाकरे यांच्या मुलाचा विवाह येवला तालुक्यातील गोपाळवाडी येथे शुक्रवारी होणार होता. त्यासाठी वऱ्हाडी दोन टेम्पोमधून निघाले होते. त्यापैकी एमएच-२० ईजी-०१५८ क्रमांकाच्या टेम्पोची समोरून येणाऱ्या जीजे-२७ टीएफ-५५३५ क्रमांकाच्या कंटेनरशी समोरासमोर धडक झाली. अपघातावेळी टेम्पोमध्ये सुमारे २५ प्रवासी प्रवास करत होते.

अपघाताची माहिती मिळताच घायगाव परिसरातील ग्रामस्थांनी तातडीने घटनास्थळी धाव घेत मदतकार्य सुरू केले. जखमींना वाहनातून बाहेर काढून चार रुग्णवाहिकांच्या मदतीने वैजापूर उपजिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले. त्यानंतर पुढील उपचारासाठी सर्व जखमींना छत्रपती संभाजीनगर येथील घाटी रुग्णालयात हलविण्यात आले.

घटनेची माहिती मिळताच उपविभागीय पोलीस अधिकारी भागवत फुंदे, पोलीस निरीक्षक सत्यजित ताईतवाले तसेच सहायक पोलीस निरीक्षक अर्चना अभंग यांनी घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली.

जखमींची नावे

जयसिंग रतन वाघ (२५), राम कल्याण वाघ (२०), गणेश



रामचंद्र जाधव (३०), अजय बाजीराव जाधव (१८), विशाल जाधव (१८), किसन वामन वाघ (२०), रंजित गुलाब वाघ (२५), जितेंद्र वाघ (२५), शालिनी सोनवणे (३५), सिद्धू वाघ (१९), श्रीनाथ वाघ (२०), कैलास वाघ (२६), चेतन वाघ (२०), सुनील वाघ (३०), सोन्या वाघ (२०), संतोष वाघ (२०), अजय सोनवणे (२०) तसेच अन्य दोन अनोळखी व्यक्ती जखमी झाल्या आहेत.

तासभर वाहतूक ठप्प

या भीषण अपघातात दोन्ही वाहनांचे मोठे नुकसान झाले. अपघातग्रस्त वाहने रस्त्याच्या मध्यभागी असल्याने वैजापूर-गंगापूर मार्गावरील वाहतूक जवळपास तासभर ठप्प झाली होती. पोलिसांनी क्रेनच्या सहाय्याने वाहने बाजूला करून वाहतूक सुरळीत केली.

यात्रेत फुगे विकणाऱ्या ज्ञानेश्वरचा दुर्दैवी अंत

मृत्यू झालेला ज्ञानेश्वर वाघ हा विविध यात्रांमध्ये रंगीबेरंगी फुगे विकून कुटुंबाचा उदरनिर्वाह करण्यास हातभार लावत होता. त्याच्या अपघाती निधनाची वार्ता कळताच वडील रुपचंद वाघ, बहीण व इतर नातेवाईकांनी घाटी रुग्णालयात धाव घेतली. दोन-तीन वर्षांत ज्ञानेश्वरचा विवाह होईल, अशी स्वप्ने कुटुंबीयांनी पाहिली होती; मात्र नियतीने त्यांच्यावर दुःखाचा डोंगर कोसळला

संपादकीय

# अपमान झाल्यास योग्य प्रतिक्रिया आणि उपाय

मानवी आयुष्यात सन्मान ही अत्यंत महत्त्वाची गोष्ट आहे. प्रत्येक व्यक्तीला प्रेम, आदर आणि आपुलकी हवी असते. पण अनेक वेळा नात्यांमध्ये, कुटुंबात, समाजात किंवा कामाच्या ठिकाणी काही लोक शब्दांनी, वागण्याने किंवा टोमण्यांतून दुसऱ्यांचा अपमान करतात. अपमान हा केवळ काही क्षणांचा प्रसंग नसतो. तो मनावर खोल परिणाम करून जातो. काही लोक बाहेरून शांत दिसतात पण आतून खूप तुटलेले असतात. म्हणूनच अपमानाच्या प्रसंगी योग्य प्रतिक्रिया देणे आणि त्यातून स्वतःला सावरणे खूप महत्त्वाचे असते.

१) माहेरी एखाद्या सदस्याने विनाकारण अपमान केला तर

. माहेर हे मुलगी असो किंवा मुलगा प्रत्येकासाठी भावनिक आधाराचं ठिकाण असतं. तिथे माणूस स्वतःला सुरक्षित समजतो. त्यामुळे माहेरीच एखाद्याने अपमान केला तर मन अधिक दुखावलं जातं. अनेकदा घरातील वाद, मतभेद, आर्थिक ताण, गैरसमज किंवा जुन्या गोष्टींमुळे एखादी व्यक्ती चुकीचं बोलून जाते.अशा वेळी प्रथम स्वतःवर नियंत्रण ठेवणे खूप गरजेचे आहे. रागाच्या भरात बोललेले शब्द नात्यांमध्ये कायमची दरी निर्माण करू शकतात. लगेच प्रति उत्तर देऊन वातावरण तापवण्यापेक्षा शांत राहून योग्य वेळेची वाट पाहावी. नंतर त्या व्यक्तीशी एकांतात बोलून, तुमच्या बोलण्याने मला खूप वाईट वाटलं हे शांतपणे सांगणे आवश्यक आहे.अनेकदा लोकांना स्वतःच्या शब्दांचा दुसऱ्यावर किती परिणाम होतो हे कळत नाही. संवादातून गैरसमज दूर होऊ शकतात. पण जर वारंवार अपमान होत असेल, सतत कमी लेखलं जात असेल तर स्वतःचा आत्मसन्मान जपणं आवश्यक आहे. प्रत्येक वेळी गप्प बसणं हे सहनशीलतेचं लक्षण नसतं. कधी कधी तो स्वतःवर अन्याय असतो. घरातील समंजस व्यक्ती, आई वडील, भाऊ बहिण किंवा ज्येष्ठ मंडळी यांच्याशी बोलून परिस्थिती सुधारण्याचा प्रयत्न करावा. पण कोणत्याही परिस्थितीत कटुता, सूडभावना किंवा नातं तोडण्याचा निर्णय घाईत घेऊ नये. कारण रक्ताची नाती तुटली की त्याची वेदना आयुष्यभर मनात राहते.

२) सासरी विनाकारण अपमान झाला तर...

. सासर हे आयुष्यातील नवीन नात्यांचं घर असतं. तिथे जुळवून घेताना प्रत्येक व्यक्ती प्रयत्न करत असते. पण काही वेळा टोमणे, तुलना, कमी लेखणे, सतत चुका काढणे किंवा सार्वजनिकरित्या बोलणे यामुळे मानसिक त्रास निर्माण होतो. विशेषतः स्त्रियांना अशा परिस्थितीला जास्त सामोरं जावं लागतं. पण पुरुषांनाही काही वेळा सासरी अपमान सहन करावा लागतो.अशा वेळी पहिली गरज असते ती संयमाची. लगेच भांडण किंवा कठोर प्रतिक्रिया दिल्यास वातावरण अधिक तणावपूर्ण होऊ शकते. मात्र शांत राहणे म्हणजे अपमान स्वीकारणे नाही. योग्य वेळ साधून स्पष्ट आणि नम्र शब्दांत आपली भूमिका मांडावी.पती पत्नीचे नाते येथे अत्यंत महत्त्वाचे ठरते. जोडीदाराने एकमेकांची बाजू समजून घेणे, भावनिक आधार देणे आणि चुकीच्या गोष्टींना योग्य प्रकारे विरोध करणे आवश्यक असते. सतत मानसिक त्रास होत असेल तर घरात मोकळेपणाने चर्चा व्हावी.काही लोकांना दुसऱ्यांवर नियंत्रण ठेवण्याची सवय असते. अशा वेळी स्वतःची मानसिक ताकद टिकवणे गरजेचे असते. स्वतःला दोष देत बसण्यापेक्षा स्वतःच्या गुणांवर विश्वास ठेवावा. गरज पडल्यास समुपदेशन, विश्वासू नातेवाईक किंवा कुटुंबातील ज्येष्ठ व्यक्तींची मदत घ्यावी.सासर आणि माहेर या दोन्ही ठिकाणी माणूस म्हणून आदर मिळणं आवश्यक आहे. नातं टिकवताना स्वतःचा स्वाभिमान हरवू देऊ नये.

३) समाजात किंवा समूहामध्ये सर्वांसमोर अपमान झाला तर...

. सार्वजनिक ठिकाणी अपमान झाला की मनाला सर्वात जास्त वेदना होतात. कारण तिथे केवळ शब्दांचा त्रास नसतो तर लोकांसमोर झालेली लाज, कमीपणा आणि मानसिक धक्का असतो. काही लोक स्वतःला श्रेष्ठ दाखवण्यासाठी दुसऱ्यांचा अपमान करतात.
अशा वेळी सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे स्वतःवर नियंत्रण ठेवणे. रागाच्या भरात ओरडणे, शिवीगाळ करणे किंवा आक्रमक होणे परिस्थिती आणखी बिघडवू शकते. शांत राहून ठामपणे उत्तर देणे हा सर्वोत्तम मार्ग असतो.उदाहरणार्थ, कृपया आदराने बोला", "माझ्याशी अशा पद्धतीने बोलणे योग्य नाही असे स्पष्ट शब्दांत सांगता येते. यामुळे समोरच्यालाही मर्यादा समजतात. प्रत्येक व्यक्तीला स्वतःचा सन्मान जपण्याचा अधिकार आहे.

# पालकमंत्री शिरसाटांविरोधात सत्तारांची नाराजी; संभाजीनगरच्या राजकारणात नवा संघर्ष?

**लोकनेता न्युज नेटवर्क**
छ.संभाजीनगर | डॉ.ज्ञानदेव चेपटे

छ.संभाजीनगर,दि.४:जिल्ह्याच्या राजकारणात पुन्हा एकदा महायुतीतील अंतर्गत मतभेद चव्हाट्यावर आले आहेत. पालकमंत्री तथा शिवसेना नेते संजय शिरसाट यांच्याविरोधात आमदार अब्दुल सत्तार यांनी उघडपणे नाराजी व्यक्त केल्याने राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण आले आहे. शिरसाट यांना पालकमंत्री पदावरून हटवावे,अशी मागणी होत असल्याचे वृत्त समोर आले असून त्यामुळे जिल्ह्यातील सत्ताधारी गटातील अंतर्गत संघर्ष अधिक तीव्र झाल्याचे चित्र आहे.
वृत्तानुसार, आमदार अब्दुल सत्तार यांनी पालकमंत्री संजय शिरसाट यांच्यावर आपल्या मतदारसंघाला दुय्यम वागणूक दिल्याचा आरोप केला आहे. विकासकामांसाठी आवश्यक असलेला निधी मुद्दाम रोखण्यात आला किंवा कमी प्रमाणात देण्यात आल्याची भावना त्यांनी व्यक्त केली आहे. त्यामुळे मतदारसंघातील अनेक प्रलंबित विकासकामे रखडल्याचा दावा सत्तार यांनी केला आहे.
या नाराजीची माहिती मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यापर्यंत पोहोचल्याची चर्चा आहे. मुख्यमंत्री स्तरावर याबाबत चर्चा झाल्याचेही सांगितले जात आहे. महायुतीतील दोन प्रभावी नेत्यांमधील हा वाद केवळ वैयक्तिक नसून आगामी स्थानिक स्वराज्य




संस्थांच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर राजकीय वजन वाढविण्याच्या प्रयत्नांचा भाग असल्याचे जाणकारांचे मत आहे.
"गटबाजी नको" – शिंदे समर्थकांची भूमिका
या संपूर्ण प्रकरणावर प्रतिक्रिया देताना शिंदे गटातील काही नेत्यांनी कोणत्याही परिस्थितीत गटबाजी होऊ नये, अशी भूमिका घेतली आहे. जिल्ह्याच्या विकासासाठी सर्व लोकप्रतिनिधींनी एकत्र काम करण्याची गरज असल्याचे सांगण्यात आले आहे. मतभेद असले तरी ते पक्षाच्या अंतर्गत बैठकीत सोडवावेत, असे मत व्यक्त करण्यात येत आहे.
राजकीय निरीक्षकांच्या मते, संभाजीनगर जिल्ह्यात शिवसेनेचे अनेक प्रभावी नेते आहेत. त्यामुळे निधी वाटप, पदांचे वितरण आणि निवडणुकांतील उमेदवारी यांसारख्या मुद्द्यांवरून वेळोवेळी संघर्ष निर्माण होत असतो. सध्या सुरू असलेला वादही त्याचाच एक भाग मानला जात आहे.
सत्तारांची नाराजी दूर होणार?
अब्दुल सत्तार यांनी जरी नाराजी व्यक्त केली असली तरी त्यांनी मुख्यमंत्री शिंदे यांच्याविषयी निष्ठा कायम असल्याचे स्पष्ट केले असल्याचे वृत्तात नमूद करण्यात आले आहे. त्यामुळे हा संघर्ष पक्षविरोधी नसून स्थानिक पातळीवरील प्रश्नांशी संबंधित असल्याचे सांगितले जात आहे. राजकीय सूत्रांच्या माहितीनुसार, वरिष्ठ पातळीवरून मध्यस्थी करून हा वाद मिटविण्याचे प्रयत्न सुरू आहेत. आगामी निवडणुकांपूर्वी कोणताही वाद वाढू नये, यासाठी पक्ष नेतृत्व विशेष काळजी घेत असल्याचे समजते.
जिल्हा बँकेच्या राजकारणात अतुल सावे यांची एंट्री
दरम्यान, जिल्हा बँकेच्या राजकारणात भाजपकडून मंत्री अतुल सावे यांची एंट्री झाल्याने नवीन राजकीय समीकरणे तयार होत असल्याचे दिसत आहे. जिल्हा बँकेवरील नियंत्रणासाठी विविध पक्षांमध्ये आणि नेत्यांमध्ये हालचाली वाढल्या आहेत.
सावे यांच्या सहभागामुळे भाजपची ताकद वाढणार असल्याचे मानले जात आहे. त्याचवेळी महायुतीतील इतर घटक पक्षांनाही आपली भूमिका अधिक मजबूत करण्याची गरज निर्माण झाली आहे. त्यामुळे जिल्हा बँकेच्या निवडणुकांकडे आता संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

### आगामी निवडणुकांवर परिणाम?

स्थानिक स्वराज्य संस्था, जिल्हा परिषद, पंचायत समित्या आणि इतर निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर सुरू झालेला हा वाद महत्त्वाचा मानला जात आहे. महायुतीतील मतभेद वाढल्यास विरोधकांना त्याचा फायदा होऊ शकतो. त्यामुळे वरिष्ठ नेतृत्व या घडामोडींवर बारकाईने लक्ष ठेवून आहे.

संभाजीनगरच्या राजकारणात सध्या शिरसाट, सत्तार आणि सावे या तीन नेत्यांभोवती चर्चा केंद्रित झाली असून येत्या काही दिवसांत या संघर्षाचे पुढे काय परिणाम होतात, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. जिल्ह्यातील राजकीय वातावरण मात्र या घडामोडींमुळे चांगलेच तापले आहे.

# खरीप हंगामात शेतकऱ्यांनी अल निनोच्या पार्श्वभूमीवर आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करावा

## तालुका कृषि अधिकारी चंद्रकांत निमोड यांचे आवाहन

**लोकनेता न्यूज नेटवर्क**
किनवट:शेख शौकत

चालू वर्षी अल निनोच्या प्रभावामुळे कमी पाऊस पडण्याची आणि पावसाचा मोठा खंड पडण्याची शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे. या आव्हानात्मक परिस्थितीत तालुक्यातील शेतकरी बांधवांनी पारंपारिक पद्धतीला फाटा देत आधुनिक आणि सुधारित कृषी तंत्रज्ञानाचा अवलंब करावा, असे आवाहन किनवटचे तालुका कृषि अधिकारी श्री. चंद्रकांत निमोड यांनी केले आहे. खरीप हंगाम यशस्वी करण्यासाठी आणि शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान टाळण्यासाठी कृषी विभागाने महत्त्वाची मार्गदर्शक सूचना जारी केल्या आहेत.
सोयाबीन पेरणी व्यवस्थापन व दुबार पेरणी टाळण्याचे उपाय: रुंद वरंबा सरी पद्धतः सोयाबीनची लागवड रुंद वरंबा सरी पद्धतीने किंवा गादीवाफ्यावर (बेडवर) टोकन पद्धतीने करावी. यामुळे कमी पाऊस पडल्यास जमिनीत ओलावा टिकून राहतो आणि अतिवृष्टी झाल्यास पाण्याचा निचरा होतो. ट्रॅक्टरने पेरणी करताना यंत्राचे मधले फाळ बंद ठेवून ६ ते ८ ओळींनंतर (पेरणीनंतर एक महिन्याने) सरी काढल्यास उत्तम जलसंधारण होते. ८० ते १०० मिमी पाऊस झाल्यावरच पेरणीः घाईगडबडीत पेरणी न करता, जमिनीमध्ये किमान ८० ते १०० मिलिमीटर पाऊस होऊन पुरेशी ओल निर्माण झाल्यावरच पेरणी करावी.पेरणी करताना बियाणे ३ ते ४ सेंटीमीटर पेक्षा जास्त खोल पडणार नाही याची दक्षता घ्यावी. उगवण क्षमता तपासणी: उत्पादन खर्च कमी करण्यासाठी शक्यतो घरचेच बियाणे वापरावे. बियाणे घरचे असो की बाजारातील बियाण्याची उगवण क्षमता तपासणी करूनच पेरणी करावी, उगवण क्षमता तपासणी करण्यासाठी पेरणीपूर्वी ७दिवस आधी बियाणे खरेदी करावी. पीक पद्धती व उत्पादकता वाढः आंतरपीक पद्धतीः यावर्षी जोखीम कमी करण्यासाठी सोयाबीन अधिक तूर या आंतरपीक पद्धतीचा स्वीकार करावा. कपाशीची लागवड कमी अंतरावर किंवा घन



पद्धतीने करून उत्पादकता वाढवावी. तसेच कमी कालावधीत आणि लवकर काढणीस येणाऱ्या वाणांची निवड करावी. बीजप्रक्रिया अनिवार्यः पेरणीपूर्वी बियाण्यास बुरशीनाशक व रायझोबियम, अझेटोबॅक्टर सारख्या जैविक खतांची बीजप्रक्रिया आवर्जून करावी. रासायनिक खतांचा संतुलित वापर करून खर्च कमी कराः उत्पादन खर्च मर्यादित ठेवण्यासाठी रासायनिक खतांचा अतिवापर टाळावा. त्याऐवजी रायझोबियम, अझेटोबॅक्टर, पीएसबी यांसारखी जैविक खते, तसेच नॅनो युरिया आणि नॅनो डीएपी चा वापर करून आपला खर्च कमी करावा.ङ्ग फार्मर आयडी काढणे बंधनकारकः ङ्गकृषी विभागाच्या सर्व शासकीय योजनांचा लाभ घेण्यासाठी शेतकऱ्यांकडे फार्मर आयडी असणे अत्यंत आवश्यक आहे. किनवट तालुक्यातील ज्या उर्वरित खातेदार शेतकऱ्यांनी फार्मर आयडी त्वरित काढून घ्यावा. शासकीय योजना व डिजिटल माध्यमांचा लाभ घ्याः कृषी विभागाच्या शेततळे, प्लास्टिक अस्तरीकरण, तुषार व ठिबक सिंचन, फळबाग लागवड या योजनांचा लाभ घेऊन उपलब्ध पाण्याचा कार्यक्षम वापर करावा. शेतीविषयक सविस्तर मार्गदर्शनासाठी महाविस्तार अॅप २.० मोबाईलमध्ये डाऊनलोड करावे, ज्यावर सर्व प्रकारच्या पिकांचे मार्गदर्शन व्हिडिओ स्वरूपात उपलब्ध आहे. कृपाणी फाउंडेशनच्या फार्मर कप स्पर्धेत गावाने सहभागी होऊन, शेतकरी गटबांधणी करावी आणि एसओपी पद्धतीचा अंगीकार करावा. "हवामानातील बदलाचा विचार करता शेतकऱ्यांनी पेरणीचे योग्य नियोजन करावे, बियाणे उगवण क्षमता तपासणी, बीजप्रक्रिया आणि लागवड पद्धतीबाबत काही अडचण असल्यास तात्काळ आपल्या गावातील सहायक कृषी अधिकारी यांचेशी संपर्क साधावा. श्री. चंद्रकांत निमोड (तालुका कृषि अधिकारी,
किनवट)

# हिमायतनगर तालुक्यातील 50 ग्रामपंचायतींच्या प्रभाग आरक्षण सोडतीचा कार्यक्रम जाहीर

## आरक्षण सोडतीसाठी नागरिकांनी उपस्थित राहावे; तहसीलदार पल्लवी टेमकर यांचे आवाहन..

**लोकनेता न्युज नेटवर्क**
हिमायतनगर, लक्ष्मण शेन्नेवाड

राज्य निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार हिमायतनगर तालुक्यातील निवडणुकीस पात्र असलेल्या ५० ग्रामपंचायतींच्या सदस्य पदांच्या प्रभाग आरक्षण सोडतीचा कार्यक्रम जाहीर करण्यात आला आहे. अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग तसेच महिला आरक्षण निश्चित करण्यासाठी विशेष ग्रामसभांमध्ये आरक्षण सोडत काढण्यात येणार असून या प्रक्रियेस नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन तहसीलदार पल्लवी टेमकर यांनी केले आहे.

राज्य निवडणूक आयोगाने प्रसिद्ध केलेल्या कार्यक्रमानुसार आरक्षण सोडतीसाठी विशेष ग्रामसभेची सूचना ८ जून २०२६ रोजी देण्यात येणार आहे. त्यानंतर ८जून ९जून १० जून ११जून १२ जून २०२६ रोजी विशेष ग्रामसभा घेऊन तहसीलदारांनी प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली आरक्षण सोडत काढली जाणार आहे. या सोडतीमध्ये अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग, अनुसूचित जाती महिला, अनुसूचित जमाती महिला, नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग महिला तसेच सर्वसाधारण महिला या प्रवर्गांचे आरक्षण निश्चित केले जाणार आहे.आरक्षण सोडतीनंतर प्रभागनिहाय आरक्षणाचा प्रारूप तयार करून जिल्हाधिकाऱ्यांकडे मंजुरीसाठी पाठविण्यात येणार आहे. जिल्हाधिकाऱ्यांच्या मान्यतेनंतर १९ जून २०२६ रोजी प्रारूप आरक्षण प्रसिद्ध करण्यात येईल. त्यानंतर संबंधित नागरिकांना आरक्षण निश्चितीबाबत हरकती व सूचना दाखल करण्याची संधी देण्यात येणार असून १९ जून ते २५ जून २०२६ या कालावधीत हरकती स्वीकारल्या जाणार आहेत. प्राप्त हरकतींवर उपविभागीय अधिकारी विचार करून आपला अभिप्राय सादर करतील. त्यानंतर अंतिम आरक्षण अधिसूचनेला जिल्हाधिकाऱ्यांची मंजुरी मिळून १० जुलै २०२६ रोजी अंतिम प्रभाग आरक्षणाची व्यापक प्रसिद्धी करण्यात येणार आहे. या प्रक्रियेमुळे ग्रामपंचायत निवडणुकांसाठी आरक्षणाचा मार्ग मोकळा होणार असून पुढील निवडणूक कार्यक्रमासाठी प्रशासनाची तयारी सुरू झाली आहे.दरम्यान, तहसील कार्यालय हिमायतनगरकडून आरक्षण सोडत प्रक्रिया पारदर्शक व नियमानुसार पार पाडण्यासाठी विविध विभागांच्या अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. नियुक्त अधिकारी आणि कर्मचारी यांनी ग्रामपंचायतनिहाय आरक्षण सोडतीचे कामकाज वेळेत व काटेकोरपणे पूर्ण करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. तहसीलदार पल्लवी टेमकर यांनी सांगितले की, ग्रामपंचायत स्तरावरील आरक्षण प्रक्रिया ही लोकशाही व्यवस्थेतील महत्त्वाची बाब असून ती पूर्णपणे पारदर्शक पद्धतीने राबविण्यात येणार आहे. संबंधित ग्रामपंचायतींचे नागरिक, लोकप्रतिनिधी, सामाजिक कार्यकर्ते तसेच इच्छुक उमेदवारांनी विशेष ग्रामसभांना उपस्थित राहून आरक्षण सोडतीची प्रक्रिया प्रत्यक्ष पाहावी. यामुळे प्रक्रियेबाबत कोणताही संभ्रम राहणार नसून पारदर्शकता अधिक बळकट होईल.

चौकट

हिमायतनगर तालुक्यातील ५० ग्रामपंचायतींसाठी होणाऱ्या या आरक्षण सोडतीकडे संभाव्य उमेदवार, राजकीय पक्षांचे कार्यकर्ते तसेच नागरिकांचे लक्ष लागले असून आगामी ग्रामपंचायत निवडणुकांच्या दृष्टीने हा कार्यक्रम अत्यंत महत्त्वाचा मानला जात

# – नळ जोडणीच्या नावाखाली नागरिकांची आर्थिक पिळवणूक थांबवा...

## वाडा तालुक्यातील अंतर्गत अपूर्ण रस्त्यांची कामेही पूर्ण करण्याची मागणी

**दै. लोकनेता न्यूज नेटवर्क**
हिमायतनगर लक्ष्मण शेन्नेवाड

हिमायतनगर नगरपंचायत हद्दीमध्ये सुरू असलेल्या नवीन पाणीपुरवठा योजनेअंतर्गत नळ जोडणीच्या कामात अनियमितता होत असल्याचा गंभीर आरोप समोर आला असून, वार्ड क्रमांक १२ मधील नागरिकांनी याबाबत नगरपंचायत प्रशासनाकडे आज दि ४ जून रोजी एक लेखी निवेदन देत तात्काळ हस्तक्षेप करण्याची मागणी केली आहे. नळ जोडणीच्या नावाखाली काही नागरिकांकडून अतिरिक्त रक्कम वसूल केली जात असल्याची चर्चा शहरात सुरू असून, यामुळे नागरिकांमध्ये तीव्र नाराजीचे वातावरण निर्माण झाले आहे.
नगरपंचायत क्षेत्रात शासनाच्या निधीतून नवीन पाणीपुरवठा योजना राबविण्यात येत आहे. या योजनेअंतर्गत विविध भागांमध्ये पाईपलाईन टाकणे व घरगुती नळ जोडणी देण्याचे काम सुरू आहे. मात्र वार्ड क्रमांक १२ मधील अनेक नागरिकांना नागरिकांचा संताप; नगरपंचायत प्रशासनाच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह ?
नसल्याची तक्रार करण्यात आली आहे. अनेक लाभार्थ्यांनी अधिकृत शुल्क भरून पावत्या घेतल्या असतानाही त्यांना वारंवार नगरपंचायत कार्यालयाचे उंबरठे झिजवावे लागत असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे याहून गंभीर बाब म्हणजे नळ जोडणी देण्यासाठी अधिकृत शुल्काव्यतिरिक्त काही लाभार्थ्यांकडून चार हजार रुपयांपर्यंत रक्कम मागितली जात असल्याची चर्चा नागरिकांमध्ये सुरू आहे. शासनाकडून कोट्यवधी रुपयांचा निधी उपलब्ध करून दिला असताना नागरिकांकडून अतिरिक्त पैसे का घेतले जात आहेत, असा सवाल उपस्थित केला जात आहे.

याबाबत नगरपंचायतीने अधिकृत शुल्क किती आहे याची स्पष्ट माहिती सार्वजनिकरित्या जाहीर करावी, अशी मागणीही करण्यात आली आहे.
नागरिकांच्या म्हणण्यानुसार, काही ठिकाणी पाईपलाईनचे काम अद्याप अपूर्ण असून त्यामुळे अनेक कुटुंबांना पिण्याच्या पाण्यापासून वंचित राहावे लागत आहे. उन्हाळ्याच्या पार्श्वभूमीवर ही समस्या अधिक गंभीर बनली असून, नागरिकांना पाण्यासाठी मोठी कसरत करावी लागत आहे. त्यामुळे वार्डातील सर्व प्रलंबित नळ जोडण्या तात्काळ पूर्ण करून नागरिकांना दिलासा द्यावा, व अधिकृत कंत्राटदारांकडूनच वार्डातील नागरिकांना नळ जोडणी देण्यात यावी खाजगी व्यक्तीला नळ जोडणीची अधिकृत परवानगी देऊ नये व तानाजीकृतपणे शासकीय मालमत्तेची नाशदूस केल्याप्रकरणी नगरपंचायतीच्या मुख्याधिकाऱ्यांनी संबंधित पलंबर सह इतर जनावर फौजदारी कार्यवाही करावी अशी मागणी करण्यात आली आहे.

दरम्यान, भाजपाचे तालुका उपाध्यक्ष विलास वानखेडे यांनी प्रशासनावर टीका करत, नगरपंचायतीने दिलेल्या आदेशानुसार संबंधित अधिकृत कंत्राटदारामार्फतच नळ जोडणीचे काम करण्यात यावे, अशी मागणी केली आहे. नगरपंचायतीच्या मंजुरीशिवाय कोणत्याही खाजगी व्यक्तीने किंवा लोकप्रतिनिधींच्या हस्तक्षेपातून शासकीय पाईपलाईनला जोडणी देणे चुकीचे असून, अशा प्रकारांना आळा घालणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. अन्यथा भविष्यात प्रत्येकजण मनमानी पद्धतीने नळ जोडणी करून घेईल व त्यातून मोठ्या प्रमाणात गोंधळ निर्माण होईल, अशीही त्यांनी प्रतिक्रिया दिली.तसेच संजय माने यांनीही नगरपंचायतीने नियुक्त केलेल्या अधिकृत कंत्राटदारांकडूनच नळ जोडणीचे काम करून घ्यावे, अशी मागणी केली आहे. इतर कोणत्याही व्यक्तीला शासकीय नळ जोडणीचे काम करण्याचा अधिकार देऊ नये. नियमांचे उल्लंघन करून जोडण्या देणाऱ्यांवर कठोर फौजदारी कारवाई करण्यात यावी, असे त्यांनी स्पष्ट केले.

यासंदर्भात नागरिकांनी नगरपंचायतीचे मुख्याधिकारी, नगराध्यक्ष तसेच जिल्हाधिकारी, उपविभागीय अधिकारी आणि तहसीलदार यांच्याकडे नागरिकांनी निवेदन सादर केले आहे. यामध्ये विलास वानखेडे, संजय माने, प्रवीण मामीडवार, नागेश शिंदे, संतोष साबळकर, नागेश शिंदे, किरण माने, पपू वानखेडे, हनुमान अरेपल्लू, परमेश्वर कऱ्हाळे,यांच्यासह अनेक नागरिक उपस्थित होते. आता या गंभीर आरोपांची नगरपंचायतचे मुख्याधिकारी हे दखल घेऊन काय भूमिका घेतील याकडे संपूर्ण शहराचे लक्ष लागले आहे.

# वाडा शहरातील वीज समस्यांवर शिवसेनेचा इशारा;

## उपाययोजना न झाल्यास तीव्र आंदोलनाचा इशारा




**लोकनेता न्यूज नेटवर्क**
पालघर - श्री तुषार भोईर

वाडा - वाडा शहरात गेल्या दीड ते दोन महिन्यांपासून वारंवार होणाऱ्या वीज खंडिततेमुळे तसेच हाय-लो व्होल्टेजच्या समस्येमुळे नागरिक त्रस्त झाले असून घरगुती विद्युत उपकरणांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होत असल्याचा आरोप शिवसेना वाडा शहर विभाग प्रमुख चंद्रकांत केणे यांनी केला आहे. याबाबत महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीच्या उपविभागीय कार्यालयाला निवेदन देण्यात आले आहे. निवेदनात म्हटले आहे की, वाडा शहरात दिवस-रात्र कोणत्याही वेळी वीज पुरवठा खंडित होत असून, वीज सुरळीत असतानाही कमी-जास्त दाबामुळे नागरिकांच्या घरातील महागडी उपकरणे निकामी होत आहेत. त्यामुळे वीज ग्राहकांना आर्थिक फटका बसत असून मानसिक त्रासही सहन करावा लागत आहे.
याशिवाय, शहरातील वाढती लोकसंख्या आणि वाढते वीज ग्राहक लक्षात घेऊन आवश्यक त्या ठिकाणी नवीन ट्रान्सफॉर्मर बसविणे, जुनी व कालबाह्य वीज यंत्रणा बदलणे तसेच वीज चोरीवर कठोर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली आहे.
पावसाळा सुरू होण्याच्या पार्श्वभूमीवर ही समस्या अधिक गंभीर होण्याची शक्यता असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. त्यामुळे महावितरणने तातडीने ठोस उपाययोजना करून नियमित आणि योग्य पद्धतीने वीज पुरवठा करावा, अन्यथा नागरिकांसह महावितरण कार्यालयावर तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा शिवसेनेतर्फे देण्यात आला आहे.

# जनगणनेच्या कामात हलगर्जीपणा भोवला

## "सात कर्मचाऱ्यां विरोधात गुन्हा दाखल"

**लोकनेता न्यूज नेटवर्क**
परभणी/प्रतिनिधी :- रमेश मुलगीर

परभणी : राष्ट्रीय कर्तव्य असलेल्या जनगणनेच्या कामात हलगर्जीपणा आणि आदेशाचे उल्लंघन करणे ७ कर्मचाऱ्यांना महागात पडले आहे. जनगणना पर्यवेक्षक आणि प्रगणक म्हणून नियुक्ती होऊनही कर्तव्यावर हजर न राहिल्याबद्दल या सातही जणांविरुद्ध नवा मोंढा ठाण्यात गुन्हा दाखल झाला.
मनपाच्या जनगणनाचे चार्ज अधिकारी सय्यद आवेस हाश्मी यांनी वरिष्ठांच्या आदेशानुसार फिर्याद दिली. आगामी राष्ट्रीय जनगणनेच्या कामासाठी वरील ७ कर्मचाऱ्यांची जनगणना पर्यवेक्षक आणि जनगणना प्रगणक म्हणून अधिकृत नियुक्ती केली होती. त्यांना राष्ट्रीय जनगणनेच्या कामात तत्काळ हजर राहण्याचे आदेश प्रशासनातर्फे देण्यात आले होते. मात्र, २५ एप्रिल ते ३ जून या कालावधीत आदेश देऊनही गुन्हा दाखल झालेल्यांमध्ये खालील शिक्षकांचा व कर्मचाऱ्यांचा समावेश आहे. यात मोहम्मद सनाउल्लाखान समिउल्ला खान (फातेमा हायस्कुल, रहमत नगर, परभणी), प्रभाकर वसंतराव भोंडवे (मातोश्री धोंड्याबाई प्रायमरी स्कूल, लोणी, ता. पाथरी), प्रशांत प्रल्हादराव रेंगे (नुतन प्राथमिक शिक्षणालय, परभणी), अनंत किशनराव किरडे (श्री छत्रपती शाहू प्रायमरी स्कूल, परसावत नगर, परभणी), जब्बार अली खान रफतअली खान (अलकरिम हायस्कुल, मदिना नगर, परभणी), गोविंद रामकिशन रोडे (कै. हरिबाई वरपुडकर ज्यु. कॉलेज, पेडगाव, परभणी), लोहट सचिन मुरलीधर (मांडव्यऋषी विद्यालय, मांडाखळी) हे कर्मचारी प्रभाग समिती 'क' कल्याण मंडपम येथे हजर झाले नाहीत. त्यांनी राष्ट्रीय कर्तव्यात जाणीवपूर्वक कसूर केल्याचे स्पष्ट झाल्यानंतर प्रशासनाने कायदेशीर पाऊल उचलले.
सय्यद आवेस हाश्मी सयद अजगर हाश्मी वय 51 वर्ष व्यवसाय नौकरी (अधिक्षक तथा चार्ज अधिकारी जनगनणा 2027 प्रभाग समिती (क) कल्याण मंडपम, परभणी शहर महानगरपालीका यांनी तक्रार दिली आहे त्यानुसार 2026/जनगणना / 52/2026 दिनाक 03/06/2026 अन्वये परभणी शहर महानगर पालीका परभणी यांचे कर्मचारी राष्ट्रीय कर्तव्य पार पाडण्यास कसुर केल्याने त्यांच्यावर गुन्हा दाखल करणे बाबतचा आदेश दिल्याने वरिष्ठाचे आदेशाने फिंयाद देत आहे.
मी परभणी शहरातील सी झोन प्रभाग समीती (क) चे जनगणना चार्ज अधिकारी म्हणुन काम पाहतो. दि. 03/05/2026 ते दि.05/05/2026 असे पोतदार इंटरनॅशनल स्कुल जिंतुर रोड परभणी येथे तिन दिवस प्रशीक्षण ठेवले होते. परंतु सदर प्रशीक्षणामध्ये 1) श्री मोहमंद सनाउल्लाखान समिउल्ला खान रा फातेमा हायस्कुल रहमत नगर परभणी यांची व 2) प्रभाकर वसंतराव भोंडवे रा मातोश्री धोंड्याबाई प्रायमरी स्कुल लोणी. ता. पाथरी जि परभणी 3) प्रशांत प्रल्हादराव रेंगे, नुतन प्राथमीक शिक्षणालय परभणी 4) अनंत किशनराव किरडे, श्री. छत्रपती शाहू प्रायमरी स्कुल परसावत नगर, परभणी 5) श्री. जब्बार अली खान रफतअली खान अलकरिम हायस्कुल मदिना नगर, परभणी,, 6) श्री. गोविंद रामकिशन रोडे रा. कै. हरिबाइ परपुडकर ज्यु, कालेज, पेडगाव, परभणी 7) श्री. लोहट सचिन मुरलिधर रा. मांडाव्याऋषी विदयालय मांडाखळी, परभणी हे गैरहजर होते. म्हणुन त्यांना मी दि. 05/05/2026 रोजी नोटीस काढुन त्यांना नोटीस देण्यासाठी शिंपायामाफत पाठविली होती व दोन ते तिन वेळेस शिपाइ सदर ठिकाणी जावुन शाळा बंद असल्याने त्यांना नोटीस देता आली नाही म्हणुन दि. 18/05/2026 रोजी स्पीड पोस्टाने पाठविली होती.
दिनाक 25/04/2026 रोजी सकाळी 11.00 ते दि.03/04/2026 रोजीचे 11.00 रोजी पोवतो जनगणना पर्यवेक्षक म्हणुन 1) श्री. मोहमंद सनाउल्लाखान समिउल्ला खान रा फातेमा हायस्कुल रहमत नगर परभणी यांची व 2) प्रगणक प्रभाकर वसंतराव भोंडवे रा मातोश्री धोंड्याबाइ प्रायमरी स्कुल लोणी ता पाथरी जि परभणी 3) प्रशांत प्रल्हादराव रेंगे नुतन प्राथमीक शिक्षणालय परभणी 4) अनंत किशनराव किरडे, 5) श्री. जब्बार अली खान रफतअली खान, 6) श्री. गोविंद रामकिशन रोडे 7) श्री. लोहट सचिन मुरलिधर या सर्वाची प्रगणक म्हणुन नेमणुक केली होती व कर्तव्यावर पोतदार इंटरनॅशनल स्कुल जिंतुर रोड परभणी येथे हजर रहावे असे आदेशित करुन सुध्दा ते अदयाप पावेतो जनगणने च्या कामासाठी हजर आले नाहीत. सदरील कर्मचारी यांनी राष्ट्रीय कर्तव्य पार पाडण्यास कसुर केला आहे. त्यांच्या विरुध्दात गुन्हा नोंदविण्यासाठी मा. आयुक्त मोहदय यांनी मला प्राधिकृत केले. म्हणुन माझी वरील नमुद कर्मचारी यांच्या विरूध्द राष्ट्रीय कर्तव्य पार पाडण्यास कसुर केला म्हणुन माझी कलम 223 भारतीय न्याय संहिता सह कलम 32 लोकप्रतिनिधीत्व अधिनियम 1950,1951,1989 प्रमाणे सरकार तर्फे फिंयाद आहे.

# दोन टाक्यांचे कनेक्शन असूनही गॅसची टंचाई; पुन्हा चुलीवर स्वयंपाक करण्याची वेळ



**लोकनेता न्यूज नेटवर्क**
देगलूर प्रतिनिधी /संतोष चिद्रावार लोणीकर

शासनाने उज्वला व घरगुती गॅस योजनाद्वारे स्वयंपाक घर धुरमुक्त करण्यासाठी कोट्यावधी रुपये खर्च केले असले तरी देगलूर तालुक्यातील अनेक कुटुंबांना वेळेवर गॅस सिलेंडर मिळत नसल्याने महिलावर पुन्हा चुलीवर स्वयंपाक करण्याची वेळ आली आहे दोन टाक्याची (डीबीसी) कनेक्शन असतानाही सिलेंडर वितरणात होणाऱ्या विलंबनामुळे ग्राहकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.
एक सिलेंडर मिळाल्यानंतर दुसऱ्या सिलेंडरच्या बुकिंग साठी तब्बल 25 दिवस प्रतीक्षा करावी लागत आहे. मोठ्या कुटुंबामध्ये एक शिल्लक घ्या 15 ते 20 दिवसात संपत असल्याने उर्वरित काळात स्वयंपाकांचा प्रश्न निर्माण होतो. परिणामी अनेक घरांमध्ये पुन्हा सरपंण लाकूड आणि चुलीचा आधार घ्यावा लागत आहे . गॅस एजन्सी कडून बुकिंग प्रक्रिया कंपनीच्या ऑनलाइन प्रणालीवर आधारित असल्याचे सांगितले जात आहे. मात्र डीबीसी ग्राहकांना तातडीने बुकिंगची सुविधा, ग्रामीण भागात नेहमीच पुरवठा आणि मोठ्या कुटुंबासाठी स्वतंत्र व्यवस्था करावी अशी मागणी ग्राहकांनी केली आहे.
थरमुक्त स्वयंपाक घराचे
स्वप्न दाखविणाऱ्या योजना नंतरही महिलांना पुन्हा चुलीकडे वळावे लागत असल्याने दोन टाक्याचे कनेक्शन घेऊनही उपयोग का ?
असा संपत सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.
---------------------------------------------
,धुरात स्वयंपाक करणे ठरते त्रासदायक, आजार बळावले
गॅसवर स्वयंपाक करण्याची सवय झालेल्या महिलांना पुन्हा धुरात काम करणे त्रासदायक ठरत आहे.
धूरामुळे डोळ्यांची जळजळ, खोकला , श्वासनाचे विकार आणि इतर आरोग्यविषयक समस्या वाढत असल्याच्या तक्रारी पुढे येत आहेत. शिवाय उन्हाळा व पावसाळा सरपण गोळा करण्यासाठी कुटुंबासाठी मोठे आव्हान बनले आहे. काही ग्राहकांनी अतिरिक्त किंवा खाजगी मार्गाने सिलेंडर मिळविण्याचा प्रयत्न केला यासाठी दोन ते तीन हजार रुपये खर्च करण्याचे तयारी दर्शवूनही सिलेंडर उपलब्ध होत नसल्याची सांगितले जात आहे. पर्याय म्हणून इलेक्ट्रिकल शेगडीचा विचार करण्यात आला. मात्र वाढते विज बिल आणि वारंवार खंडित होणारा वीजपुरवठा यामुळे तो पर्याय ही मर्यादित ठरत आहे

# शेतकर्यांनी खताची आगाऊ बुकिंग करा अन्यथा खते मिळणार नाही कृषी विभागाचा सल्ला अशिक्षीत शेतकरी परेशान

**लोकनेता न्यूज नेटवर्क**
बाळु श्रीखंडे/खुलताबाद

खुलताबाद तालुक्यातील कृषी सेवा केंद्रावर शेतकऱ्यांची खतासाठी झुंबड बघायला मिळत आहे कारण शासनाने फार्मर आयडी द्वारे पडताळणी करूनच तुमच्या क्षेत्रानुसार प्रत्येक शेतकऱ्याला त्यांच्या क्षेत्रानुसार युरिया डीएपी व अन्य खते मिळणार आहेत असे शेतकऱ्यांना मार्गदर्शन करण्यात आले कृषी केंद्रावर कोणीही गर्दी न करता आपल्या मोबाईलवर ॲप डाऊनलोड करून आपल्याला कोणत्या व किती खताची आवश्यकता आहे हे ॲप मध्ये टाकून आपला नंबर तालुक्यातील ज्या ठिकाणी साठा उपलब्ध असेल त्या ठिकाणी आपला नंबर लागेल त्या ठिकाणावर




शेतकऱ्यांनी तिन दिवसाच्या आत मध्ये आपण बुकिंग केलेले खते घ्यावी असा सल्ला कृषी विभाग खुलताबाद यांनी केला त्या प्रसंगी सुलतानपूर येथे शिवशंकर कृषी सेवा केंद्र तसेच पांडुरंग कृषी सेवा केंद्र सुलतानपूर येथे खुलताबाद तालुक्यातील मंडळ कृषी अधिकारी




काकासाहेब इंगळे .प्रभाकर घायट खुलताबाद उप कृषी अधिकारी .प्रतीक्षा दसपुते सहाय्यक कृषी अधिकारी खुलताबाद तसेच काकासाहेब जाधव किशोर जाधव सुलतानपूर येथील माजी सरपंच मनोज श्रीखंडे प्रेमसिंग जोनवाल भारत कोकणे अमोल जाधव दैनिक लोकनेताचे तालुका प्रतिनिधी बाळू श्रीखंडे हे उपस्थित होते तरी सर्व शेतकऱ्यांनी आपापल्या मोबाईलवरून आपापली खते बुकिंग करून घ्यावी असा सल्ला कृषी कार्यालयाने दिला....चौकट.
आता ऐन पेरणीची वेळ आहे मि दोन दिवसांपासून बुकिंग करत आहे ॲपमधे खुप प्रॉब्लेम आहे ऑनलाइन चा शेतकर्याना त्रास नको तरी शेतकऱ्यांना बांधापर्यंत खते मिळावी
जयपालसिंग झाला शेतकरी

# बीड शहरातील महत्त्वाच्या रस्त्यांच्या कामांना आज प्रत्यक्ष सुरुवात!

## नागरिकांना एकच विनंती आहे की नव्याने जबाबदारी स्वीकारलेल्या या टीमला थोडा वेळ द्यावा.

**लोकनेता न्यूज नेटवर्क**

बालाजी जगतकर बीड -आमदार विजयसिंहजी पंडित व नगराध्यक्ष श्रीमती प्रेमलता ताई पारवे यांच्या मार्गदर्शनाखाली आज जालना रोड ते पुण्यश्लोक अहिल्यामाता होळकर पुतळा मार्गे सुभाष रोड (जिल्हा स्टेडियम परिसर) तसेच जिल्हा परिषद ते नगरपरिषद समोरील रस्त्यांच्या कामांना प्रत्यक्ष सुरुवात करण्यात आली. गेल्या अनेक वर्षांपासून खराब रस्त्यांमुळे नागरिकांना मोठ्या गैरसोयींचा सामना करावा लागत होता. या पार्श्वभूमीवर शहरातील नागरिकांना दर्जेदार, सुरक्षित व सुकर रस्ते उपलब्ध करून देण्यासाठी ही कामे हाती घेण्यात आली आहेत.नगर परिषदेची संपूर्ण टीम या कामांबाबत अत्यंत दक्ष राहून कामाची सुरुवात केली असून प्रत्येक टप्प्यावर गुणवत्तेवर बारकाईने लक्ष ठेवले जाणार आहे. विकासकामांच्या गुणवत्तेबाबत कोणतीही तडजोड केली जाणार नाही, ही आमची स्पष्ट भूमिका आहे.



याचबरोबर शहरातील उर्वरित मंजूर रस्त्यांची कामे देखील येत्या आठ दिवसांत टप्प्याटप्प्याने सुरू करण्यात येणार असून बीड शहरातील पायाभूत सुविधांच्या विकासाला अधिक गती दिली जाणार आहे. नागरिकांना एकच विनंती आहे की नव्याने जबाबदारी स्वीकारलेल्या या टीमला थोडा वेळ द्यावा. बीड शहराचा चेहरा-मोहरा बदलण्यासाठी आम्ही प्रामाणिकपणे आणि पूर्ण क्षमतेने प्रयत्न करत आहोत. पूर्वी याच टीमने विरोधी पक्षात असताना



देखील शहरातील अनेक रस्त्यांची कामे दर्जेदार पद्धतीने करून घेतली होती. आज हीच टीम सत्तेत असल्याने नागरिकांच्या अपेक्षा पूर्ण करणे, दर्जेदार विकासकामे करणे आणि शहराला अधिक सक्षम पायाभूत सुविधा उपलब्ध करून देणे हीच आमची सर्वोच्च प्राथमिकता राहणार आहे. बीड शहराच्या सर्वांगीण विकासासाठी आम्ही कटिबद्ध असून नागरिकांच्या विश्वासाला पात्र ठरण्यासाठी सातत्याने काम करत राहू.



यावेळी माझ्यासह गटनेते फारूक पटेल साहेब, संपादक शेख मुजीब भाई, ज्येष्ठ नगरसेवक सय्यद सादिक जमा, नगरसेवक अशफाक इनामदार, नगरसेवक जैतुल्ला खान, नगरसेवक रामदास सरवदे, नगरसेवक शेख बब्बू, नगरसेवक जकी सौदागर, बरकत पठाण, माजी नगरसेवक शेख इकबाल, शेरखान आदी व पत्रकार बांधव उपस्थित होते.

# स्व.संतोष देशमुख, उमेश दळवी. कारभारी आंधळे. नंतर आता तोहिद खानचाही खून

## शिवसेना नेते. शिवाजी आंधळे सतर्कते मुळे खुनी हल्यातून बचावले जिल्ह्यात खुणाच्या घटनाची मालिका सुरुच...

## परळीत मुस्लिम द्वेषातून तोहिद खानची हत्या करणार्‍या मारेकर्‍यांच्या घरावर बुलडोजर चालवा - शेख मुजीब

**लोकनेता न्यूज नेटवर्क**
बीड विजय रोडे

बीड,:- परळी येथील अफजल उर्फ तोहिद केरातीखान पठाण या 36 वर्षीय तरूणाची अतिशय निर्घृणपणे आणि क्रुरतेने हत्या करण्यात आल्याची घटना उघडकीस आली आहे. विशेष म्हणजे तोहिद खानचा मृतदेह रेल्वे रुळाजवळ टाकून आत्महत्येचा बनाव करण्यात आला. एवढेच नव्हे तर तोहिद खानचा मृतदेह आढळल्यानंतर एक ऑडिओ क्लिप सोशल मिडियात व्हायरल झाली. त्यामध्ये मारेकरी स्वत: मुसलमानाला मारल्याबद्दल समाधान व्यक्त करत आहे. अतिशय अवमानजनक भाषा त्यामध्ये वापरल्याचे दिसून येत आहे. सदरील प्रकार अतिशय गंभीर असून थेट जातीचं नावं घेवून अत्यंत अमानुषपणे एका तरूणाची हत्या होत आहे. यावरून जिल्ह्यात पोलिसांचा किती धाक आहे हे देखील स्पष्ट होत आहे. एसपी साहेब, बुलडोजर केवळ आरोपी असणार्‍या मुसलमानांच्या घरावरच चालवण्यासाठी आहे का? याप्रकरणातील मारेकर्‍यांना परळीतील भर चौकात आणून शिक्षा द्यावी आणि त्यांच्या घरावर बुलडोजर चालवावा अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेसचे शेख मुजीब यांनी केली आहे. मस्साजोग येथील तत्कालीन सरपंच स्व.संतोष देशमुख आणि बीडमधील उमेश दळवी यांची ज्या क्रुरतेने हत्या करण्यात आली होती. त्याच पध्दतीने तोहिद खान देखील जातीयवाद्यांच्या अमानुषतेला बळी पडला आहे. या घटनेचा करावा तेवढा निषेध कमीच असल्याचे शेख मुजीब यांनी म्हटले आहे.



परळी येथील सरदारनगर भागातील अफजल उर्फ तोहिद केरातीखान पठाण (वय 36) या तरूणाची अत्यंत अमानुषपणे हत्या झाल्याची घटना उघडकीस आली आहे. मयत तोहिद खान याच्या अंगावर असलेले वळ, चेहर्‍यावर आणि गुप्तांगावर झालेली मारहाण माणूसकीला काळिमा फासणारी आहे. अत्यंत द्वेषाने आणि अमानुषतेने तोहिद खान याला मारहाण झालेली आहे. एका सर्वसामान्य कुटूंबातील तरूणाची आशा पध्दतीने केवळ जातीयद्वेषातून झालेली हत्या जिल्ह्यातील कायदा आणि सुव्यवस्थेवर प्रश्न उपस्थित करणारी आहे. तोहिद खान याची हत्या करून मारेकर्‍यानी त्याचा मृतदेह परळीतील रेल्वे रुळाजवळ फेकून दिला. प्रथमदर्शनी ही घटना अपघात किंवा आत्महत्या वाटावी असेच स्वरूप या घटनेला दिले गेले होते. मात्र काल दुपारनंतर सोशल मिडियावर व्हायरल झालेल्या व्हिडीओ क्लिपमध्ये मारेकरी अन्य एकाच्या मोबाईलवर बोलत असल्याचे दिसून येत आहे. दोघांमध्ये सुरू असलेल्या संभाषणाची ही व्हिडीओ क्लिप व्हायरल झाल्यानंतर हा प्रकार जातीयद्वेषातून झाल्याचे स्पष्ट होत आहे. मुसलमानाला मारल्याचे समाधान आहे असा समोरचा मारेकरी बोलत असल्याचे क्लिपमध्ये दिसून येत आहे. यावरून एकमेकांना सांगून आणि त्या संभाषणाचा व्हिडीओ तयार करून तोहिद खानची हत्या करण्यापर्यंत गेलेली मजल केवळ मुस्लिम समाजासाठीच नव्हे तर अन्य समाजासाठी देखील अत्यंत घातक आहे. अशा पध्दतीने सांगून आणि जातीयद्वेषातून जर हत्या होवू लागल्या तर जिल्ह्यात कायद्याचा धाक आहे की नाही? असा प्रश्न उपस्थित होवू लागला आहे. पोलिसांनी याप्रकरणाला केवळ आर्थिक व्यवहाराचे कारण सांगितले आहे. वास्तविक पाहता तोहिद खान याची अमानुषपणे झालेली हत्या आणि त्यानंतरचे व्हायरल झालेले संभाषण पाहता ही हत्या केवळ आणि केवळ जातीयद्वेषातून आणि मुस्लिम आहे म्हणूनच झालेली असल्याचे दिसून येते. त्यामुळे याप्रकरणात स्वत: पोलिस अधिक्षकांनी लक्ष घालावे आणि मारेकर्‍यांच्या घरावर बुलडोजर चालवून त्यांना भर चौकात उभे करून शिक्षा द्यावी, जेणेकरून भविष्यात कुणी अशा प्रकारचे निंदनीय आणि माणुसकीला काळिमा फासणारे कृत्य करणार नाही असे शेख मुजीब यांनी म्हटले आहे.

**हत्या प्रकरणाची सखोल चौकशी करून मारेकर्‍यांना भरचौकात शिक्षा द्या-शेख मुजीब**
परळीतील तोहीद खान या तरूणाची अत्यंत अमानुषपणे झालेली हत्या अतिशय निंदनीय आहे. आर्थिक व्यवहार हे कारण असू शकत नाही. केवळ जातीय द्वेषातून ही हत्या झाल्याचे व्हायरल व्हिडीओतून समोर आलेले आहे. त्यामुळे आरोपी अटक झाले म्हणून पोलिसांनी या प्रकरणाचा तपास थांबवू नये सदरील हत्या प्रकरणाची वरिष्ठ अधिकार्‍यांमार्फत सखोल चौकशी करावी, हत्या झाल्यानंतर सोशल मिडियावर व्हायरल झालेल्या व्हिडीओची पडताळणी करून मारेकरी ज्या व्यक्तीशी संभाषण करत आहे त्याचाही चौकशी करावी, याप्रकरणामागे कोणी मास्टरमाईंड आहे का? याचाही शोध घ्यावा आणि तोहीदच्या मारेकर्‍यांना परळीच्याच भर चौकात उभे करून शिक्षा द्यावी अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेसचे शेख मुजीब यांनी केली आहे

# चारधाम यात्रा पूर्ण केल्यानंतर उद्यापन-मावंद्याचा कार्यक्रम उत्सव सोहळा

## "जीवनात किमान एकदा चारधाम यात्रा करावी; मोक्षप्राप्तीचा हा श्रेष्ठ मार्ग" – ह.भ.प. लक्ष्मण महाराज उबाळे



**लोकनेता न्यूज नेटवर्क**
पाचोड प्रतिनिधी

चारधाम तीर्थयात्रा पूर्ण केल्यानिमित्त भास्कर जायभाये व सुमनबाई जायभाये यांच्या उद्यापन व मावंद्याचा कार्यक्रम धार्मिक आणि भक्तिमय वातावरणात संपन्न झाला. यावेळी उपस्थित भाविकांना मार्गदर्शन करताना ह.भ.प. लक्ष्मण महाराज उबाळे म्हणाले की, "जीवनामध्ये प्रत्येकाने किमान एकदा तरी चारधाम तीर्थयात्रा करावी. तीर्थयात्रेमुळे मन, बुद्धी आणि आत्म्याचे शुद्धीकरण होते. मोक्षप्राप्तीचा मार्गही यामुळे सुलभ होतो."
भास्कर जायभाये व सुमनबाई जायभाये यांनी अलीकडेच देशातील पवित्र चारधाम तीर्थक्षेत्रांची यात्रा पूर्ण केली. त्यानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या उद्यापन व मावंद्याच्या कार्यक्रमाला नातेवाईक, मित्रपरिवार, भाविक आणि ग्रामस्थांची मोठ्या संख्येने उपस्थिती लाभली.

कार्यक्रमाचे उत्कृष्ट नियोजन त्यांचे पुत्र लक्ष्मण जायभाये व नवनाथ जायभाये तसेच पुतणे प्रकाश जायभाये यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी कुटुंबातील सर्व सदस्यांनी विशेष परिश्रम घेतले.

यावेळी जायभाये कुटुंबातील सहा जावई, व सहा मुली तसेच इतर नातेवाईक मोठ्या संख्येने उपस्थित होते. गावातील प्रतिष्ठित नागरिक, ज्येष्ठ मंडळी, वारकरी संप्रदायातील भाविक आणि ग्रामस्थांनीही कार्यक्रमाला उपस्थित राहून भास्कर जायभाये व सुमनबाई जायभाये यांचे अभिनंदन केले.

धार्मिक वातावरण, भजन-कीर्तन आणि सत्संगाच्या माध्यमातून कार्यक्रमाला आध्यात्मिक स्वरूप प्राप्त झाले. उपस्थितांनी चारधाम यात्रेचे महत्त्व जाणून घेत धार्मिक संस्कार जपण्याचा संकल्प व्यक्त केला.

चारधाम यात्रा पूर्ण केल्यानंतर आयोजित करण्यात आलेला हा उद्यापन व मावंद्याचा सोहळा भक्ती, श्रद्धा आणि कौटुंबिक एकोप्याचे दर्शन घडविणारा ठरला.

# अंधारातील आशेचा किरण: तुकाराम मुंढे आणि व्यवस्थेचे विदारक वास्तव

## धडाकेबाज कामगिरी आणि आशेचा किरण

**लोकनेता न्यूज नेटवर्क**
परळी प्रतिनिधी

परळी :-प्रशासकीय अधिकारी तुकाराम मुंढे यांनी अन्न व औषध प्रशासनाचा (FDA) कारभार हाती घेताच अवघ्या एका आठवड्यात आपल्या कर्तृत्वाचा धडाका दाखवून दिला आहे. बनावट औषधांचे कारखाने असोत की खाद्यतेलातील जीवघेणी भेसळ, मुंढे यांनी या माफीयांच्या थेट मुसक्या आवळायला सुरुवात केली आहे. अवघ्या सात दिवसांत कोट्यवधी रुपयांचे बनावट साठे जप्त करून त्यांनी शेकडो भेसळखोरांना गजाआड केले आहे. सामान्यांसाठी हा कायदा आणि सुव्यवस्थेचा एक नवा आशेचा किरण ठरत आहे.

बीड जिल्ह्यातील विदारक वास्तव
एकीकडे वरिष्ठ पातळीवर एवढी मोठी कारवाई सुरू असताना, बीड जिल्ह्यातील स्थानिक यंत्रणा मात्र सुस्त आणि ढिम्म आहे. येथे भेसळखोरांना ना तहसीलदारांचा धाक उरला आहे, ना जिल्हाधिकाऱ्यांचा. स्थानिक स्तरावरील काही अधिकारी केवळ वसुली आणि पगार उचलण्यात मग्न आहेत. हॉटेल आणि व्यावसायिक ठिकाणी घरगुती गॅस सिलिंडरचा सर्रास बेकायदेशीर वापर सुरू आहे. बाजारात कार्बोहायड्रेटसारखी धोकादायक रसायने वापरून केळी, चिकू आणि आंबे पिकवून जनतेच्या आरोग्याशी खेळ केला जात आहे.

निष्पाप बालके आणि शेतकऱ्यांची फसवणूक
भ्रष्टाचाराची ही कीड थेट माणसाच्या जगण्याच्या अधिकारावर घाला घालत आहे. निष्पाप बालकांच्या दुधात भेसळ करून त्यांच्या आयुष्याशी खेळ केला जात आहे. दुसरीकडे, जगाचा पोशिंदा असलेल्या शेतकऱ्यालाही सोडले जात नाही. बोगस बी-बियाणे आणि बनावट शेती औषधे विकून शेतकऱ्यांची उघड माथी फसवणूक केली जात आहे.

डिझेल आणि पेट्रोलमधील भेसळ
डिझेल आणि पेट्रोलमध्ये होणारी भेसळ आणि मापातील घोटाळा ही ग्राहकांची मोठी फसवणूक आहे. यामुळे वाहनांचे नुकसान होते आणि आर्थिक भुर्दंड सोसावा लागतो. पेट्रोलमध्ये प्रामुख्याने नेफ्था (Naphtha), केरोसिन (rockel), किंवा सॉल्व्हेंट्स (Solvents) मिसळले जातात. डिझेलमध्ये केरोसिन किंवा स्वस्त खनिज तेलांची भेसळ केली जाते. भेसळयुक्त इंधनामुळे इंजिनमधून मोठा आवाज येतो (Knocking). इंजिनचे आयुष्य कमी होते आणि मायलेज अचानक घसरते.
तसेच पेट्रोल पंपाच्या मशीनमध्ये इलेक्ट्रॉनिक चिप किंवा सॉफ्टवेअरमध्ये फेरबदल करून ५ ते १० टक्के कमी इंधन दिले जाते. स्क्रीनवर आकडा बरोबर दिसतो, पण प्रत्यक्षात टाकीत कमी इंधन जाते. आधीच्या ग्राहकाचे रीडिंग शून्य (Zero) न करता, थेट तिथूनच पुढच्या ग्राहकाला पेट्रोल भरणे. इंधन भरून झाल्यावर नोजल (Nozzle) लगेच बाहेर काढणे असे प्रकार घडतात ज्यामुळे पाईपमधील काही इंधन मशीनमध्येच परत जाते. यावर कोण नियंत्रण ठेवणार.



रेशन घोटाळा
रेशनचे चांगले धान्य खुल्या बाजारात विकले जाते. सोबतच चांगल्या धान्यात खडे, माती किंवा निकृष्ट दर्जाचे धान्य मिसळले जाते. बऱ्याचदा वजनाचा काटा सदोष असतो किंवा चुंबकीय वस्तू वापरून वजन मॅनेज केले जाते. धान्य दिल्यानंतर 'पॉश' (ePOS) मशीनची पावती न देणे किंवा त्यावर जास्त वजन दाखवणे असा प्रकार सर्रास केले जातात.
भेसळखोर, राजकारणी आणि अधिकाऱ्यांची अभद्र युती
या संपूर्ण काळ्या धंद्याला पाठबळ मिळते ते स्वार्थी पुढाऱ्यांचे आणि भ्रष्ट अधिकाऱ्यांचे. भेसळखोर या यंत्रणेला रग्गड पैसा पुरवतात आणि या 'वाहत्या गंगेत' सर्वच जण आपले हात धुवून घेत आहेत. जनतेने तक्रारी केल्या किंवा माहिती दिली, तरी राजकारणी केवळ निवेदने स्वीकारण्याचे नाटक करतात. मतांच्या आणि पैशांच्या गणितामुळे कोणालाही या भेसळखोरांशी वैर नको असते.
एक यक्षप्रश्न
तुकाराम मुंढे जर एका आठवड्यात एवढी मोठी कारवाई करू शकतात, तर मग "या पदावर आधी असलेले अधिकारी आजवर काय करत होते?" असा संतप्त प्रश्न आता जनतेला पडला आहे. मुंढेंच्या कारवाईने पूर्वीच्या अधिकाऱ्यांचे अपयश आणि अकार्यक्षमता उघडी पाडली आहे.

आव्हान आणि अपेक्षा
आता सर्वात मोठा प्रश्न हा आहे की, ही शक्तिशाली आणि श्रीमंत 'भेसळखोर लॉबी' तुकाराम मुंढेंना या पदावर किती काळ टिकू देते? प्रामाणिक अधिकाऱ्यांची वारंवार बदली करणे हा या व्यवस्थेचा जुनाच खेळ आहे. ग्राहक पंचायत, परळी वैजनाथच्या वतीने आम्ही या धडाकेबाज कारवाईचे स्वागत करतो आणि जनतेला आवाहन करतो की, अशा प्रामाणिक अधिकाऱ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहा. ग्राहक राजा जागा हो, प्रामाणिक अधिकाऱ्याच्या पाठीशी उभा राहा!

लेखक : चंद्रकांतअप्पा समशेट्टे
तालुका अध्यक्ष : ग्राहक पंचायत, परळी

# जलसंवर्धन ही काळाची गरज; युवकांनी पुढाकार घ्यावा : जिल्हाधिकारी अशीमा मित्तल

**लोकनेता न्यूज नेटवर्क**
जालना डॉ. ज्ञानेश्वर जगताप

माय भारत, जालना, यशदा, युनिसेफ आणि पाथ्रीकर कॅम्पस, बदनापूर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या 'जलदिंडी अभियानाचा' समारोप जागतिक पर्यावरण दिनाच्या पार्श्वभूमीवर पाडळी (ता. बदनापूर) येथे उत्साहात संपन्न झाला. दि. 1 ते 5 जून, 2026 या कालावधीत बदनापूर तालुक्यातील विविध गावांमध्ये राबविण्यात आलेल्या या अभियानाद्वारे जलसंवर्धन, जलसाक्षरता आणि पर्यावरण संरक्षणाचा प्रभावी संदेश देण्यात आला. कार्यक्रमाच्या प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते वृक्षाला जलदान करून आणि वृक्षसंवर्धनाचा संदेश देत अभियानाचे उद्‌घाटन करण्यात आले.
या कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणून जिल्हाधिकारी अशीमा मित्तल उपस्थित होत्या. अध्यक्षस्थानी पाथ्रीकर कॅम्पसचे संचालक डॉ. देवेशजी पाथ्रीकर होते. यावेळी सहाय्यक जिल्हाधिकारी डॉ. रंगमंजू, जिल्हा युवा अधिकारी मयुरकुमार गोरमे, तहसीलदार अतुल बने, डॉ. रामदास निहाळ, अमृत तारो आदी मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती.
कार्यक्रमात उपस्थित मान्यवरांचा तुळशीच्या रोपांचे वितरण करून सत्कार करण्यात आला. यावेळी जलसंवर्धन, पर्यावरण संरक्षण, जलव्यवस्थापन आणि वृक्षसंवर्धन या विषयांवर सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. वाढते जलसंकट, भूजल पातळीतील सातत्याने होत असलेली घट आणि हवामान बदलाचे वाढते परिणाम लक्षात घेता युवकांनी जलसंवर्धनासाठी पुढाकार घेणे काळाची गरज असल्याचे मत मान्यवरांनी व्यक्त केले. जिल्हाधिकारी अशीमा मित्तल यांनी आपल्या मार्गदर्शनात सांगितले की, "आजच्या बदलत्या हवामान परिस्थितीत जलसंवर्धन आणि जलसाक्षरता ही प्रत्येक नागरिकाची जबाबदारी बनली आहे.
युवकांनी निसर्गाशी एकरूप होत पाणी बचत, वृक्षलागवड, पर्यावरण संवर्धन आणि जलव्यवस्थापनाबाबत समाजामध्ये व्यापक जनजागृती निर्माण करण्यासाठी सक्रिय भूमिका बजावली पाहिजे. भविष्यातील पिढ्यांसाठी सुरक्षित जलसंपत्ती निर्माण करणे ही आपली सामूहिक जबाबदारी आहे."
सहाय्यक जिल्हाधिकारी डॉ. रंगमंजू यांनी युवकांना संबोधित करताना छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळातील जलव्यवस्थापनाच्या कार्याचा उल्लेख केला. त्यांनी सांगितले की, शिवकालीन किल्ले, तलाव, बंधारे आणि जलसाठवण व्यवस्था आजही जलसंवर्धनाचे आदर्श उदाहरण आहेत. आधुनिक काळातही त्या पद्धतींचा अभ्यास करून जलसंधारणाच्या कामांना गती देण्याची आवश्यकता आहे. यावेळी जलदिंडी अभियानात सहभागी स्वयंसेवकांनी पथनाट्य सादर करून ग्रामस्थांना पाणी बचत, जलसंवर्धन आणि पर्यावरण संरक्षणाचा प्रभावी संदेश दिला. पथनाट्याला ग्रामस्थांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. तसेच विविध गावांमध्ये रॅली, जनजागृती फेऱ्या, संवाद




सत्रे आणि प्रत्यक्ष प्रबोधनात्मक उपक्रम राबविण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना जिल्हा युवा अधिकारी मयुरकुमार गोरमे यांनी सांगितले की, जलदिंडी अभियान दि. 1 ते 5 जून दरम्यान सोमठाणा, निकळक, अकोला, देवगाव, कुसळी, मात्रेवाडी, सेलगाव आणि पाडळी या गावांमध्ये यशस्वीरित्या राबविण्यात आले. या अभियानाद्वारे युवक, महिला, शेतकरी आणि ग्रामस्थांमध्ये जलसाक्षरतेबाबत जागरूकता निर्माण करण्याचा प्रयत्न करण्यात आला.
समारोपप्रसंगी अध्यक्षीय भाषणात डॉ. देवेशजी पाथ्रीकर यांनी जलसंवर्धनाबरोबरच वृक्षसंवर्धनाचे महत्त्व अधोरेखित केले. वृक्षलागवड केवळ एक दिवसाचा उपक्रम न राहता त्याचे जतन, संगोपन आणि संवर्धन होणे आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले. युवकांनी सामाजिक जबाबदारीची जाणीव ठेवून पर्यावरण संरक्षणासाठी सातत्याने कार्यरत राहावे, असे आवाहन त्यांनी केले.
कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सहारा सामाजिक विकास संस्थेचे अध्यक्ष बी. एस. सय्यद यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी ग्रामसेवक पवन अवघन, पोलीस पाटील भाग्यश्री शेळके, अविनाश शेळके, युवा बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेचे अध्यक्ष जयपाल राठोड, तेजस जनविकास संस्थेचे अध्यक्ष शिवाजी तायडे, प्रा. अविनाश हटकर तसेच विविध स्वयंसेवकांनी विशेष परिश्रम घेतले. या कार्यक्रमास गावकरी, महिला, युवक आणि विद्यार्थ्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# नदी-नाल्यांतून सुरूच रेती-मुरूम तस्करी?

**कोरपना तालुक्यातील विविध घाटांमधून रात्रीच्या अंधारात अवैध वाहतूक; महसूल व वनविभागाच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह**

**लोकनेता न्यूज नेटवर्क**
चंद्रपुर/ सिद्धेश्वर केंद्रे

कोरपना तालुक्यातील सोनुर्ली, गाडेगाव, अंतरगाव, नारांडा, झोटिंग, सांगोडा, भोयगाव, भारोसा परिसरातील तामसी व भैराम घाटांसह विविध नदी-नाल्यांमधून मोठ्या प्रमाणात रेती व मुरूमाची अवैध वाहतूक सुरू असल्याची चर्चा परिसरात रंगली आहे. स्थानिक नागरिक व सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, रात्री उशिरापासून पहाटेपर्यंत ट्रॅक्टर, हायवा व इतर वाहनांच्या माध्यमातून रेतीची वाहतूक केली जात असल्याचा आरोप होत आहे.
स्थानिकांच्या म्हणण्यानुसार, काही नदीघाटांमधून रात्री १२ ते सकाळी ७ वाजेपर्यंत जेसीबीच्या साहाय्याने रेती उपसा करून वाहतूक केली जात असल्याचे चित्र दिसून येत आहे. काही ठिकाणी रेतीचे दरही मोठ्या प्रमाणात वाढल्याने अवैध उत्खननाला चालना मिळत असल्याची चर्चा आहे.



**महसूल व वनविभागाच्या कार्यपद्धतीवर सवाल**
या कथित अवैध उत्खननाबाबत महसूल विभाग, तलाठी, मंडळ अधिकारी तसेच वनविभाग यांच्याकडून प्रभावी कारवाई होत नसल्याचा आरोप नागरिकांकडून केला जात आहे. गडचांदूर येथे मंडळ अधिकाऱ्यांचे कार्यालय असतानाही परिसरात रेती व मुरूम वाहतूक सुरू असल्याची चर्चा असून संबंधित विभागांनी याकडे गांभीर्याने लक्ष देण्याची मागणी होत आहे.
**अनेक घाट तस्करांच्या निशाण्यावर?**
सोनुर्ली, गाडेगाव, अंतरगाव, नारांडा, झोटिंग, सांगोडा, भारोसा परिसरातील तामसी व भैराम घाटांमध्ये मोठ्या प्रमाणात रेतीसाठा उपलब्ध असल्याने या घाटांवर अवैध उत्खनन करणाऱ्यांची नजर असल्याचे बोलले जात आहे. मागील काही आठवड्यांपासून या भागांतून दिवस-रात्र रेती व मुरूम उपसा होत असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे.
**चौकशी व कारवाईची मागणी**
स्थानिक नागरिकांनी या प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणी प्रशासनाकडे केली आहे. अवैध उत्खननामुळे पर्यावरणाचा समतोल बिघडण्यासोबतच नदीपात्रांचे नुकसान होत असल्याची चिंता व्यक्त केली जात आहे. त्यामुळे महसूल विभाग, वनविभाग व पोलिस प्रशासनाने संयुक्त मोहीम राबवून सत्यस्थिती पडताळून आवश्यक ती कारवाई करावी, अशी मागणी होत आहे.

# लातूरमध्ये 7 जून रोजी 'संडे ऑन सायकल' मोहिमेचे आयोजन



**लोकनेतान्युज नेटवर्क**
लातूर फिरोज जागीरदार

लातूर, (जिमाका) : भारत सरकारच्या क्रीडा व युवक कल्याण मंत्रालयाद्वारे 'खेलो इंडिया' योजनेच्या 'फिट इंडिया' उपक्रमांतर्गत रविवार, ७ जून २०२६ रोजी लातूर शहरात 'संडे ऑन सायकल' या विशेष मोहिमेचे आयोजन करण्यात आले आहे. नागरिकांमध्ये तंदुरुस्ती व नियमित व्यायामाचे महत्त्व रुजवण्यासाठी तसेच लठ्ठपणाशी लढण्यासाठी आयोजित केलेल्या या सायकल रॅलीचा मार्ग जिल्हा क्रीडा संकुल येथून सुरू होऊन राजीव गांधी चौक, वाडा हॉटेल, पी.व्ही.आर. चौक आणि छत्रपती शिवाजी महाराज चौक मार्गे पुन्हा जिल्हा क्रीडा संकुल असा निश्चित करण्यात आला आहे.

तरी या मोहिमेमध्ये जिल्ह्यातील सर्व क्रीडाप्रेमी, नागरिक, सायकलिंग क्लब, शाळा व महाविद्यालयांमधील विद्यार्थी आणि खेळाडूंनी ७ जून २०२६ रोजी सकाळी ठीक ७ वाजता मोठ्या संख्येने सहभागी व्हावे आणि या उपक्रमासाठी https://fitindia.gov.in/world-bicycle-day या संकेतस्थळावर आपली नोंदणी करावी, असे आवाहन लातूरचे जिल्हा क्रीडा अधिकारी महादेव कसगावडे यांनी केले आहे.
***

# लिंबाळा येथे वीज पडून 13 शेळ्यांचा मृत्यू



**लोकनेता न्यूज नेटवर्क**
लातूर फिरोज जागीरदार

निलंगा तालुक्यातील लिंबाळा थे शुक्रवारी दुपारी वीज पडून १३ शेळ्यांचा मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना घडली. प्राप्त माहितीनुसार, वीज कोसळल्याने मधुकर पिराजी खांडेकर यांच्या ९ शेळ्या, संतोष नाईकवाडे यांच्या ३ शेळ्या आणि शिवाजी नीला यांच्या १ शेळीचा जागीच मृत्यू झाला.

# शहरात 40,000 झाडे लावणार महापौर सय्यद इकबाल यांची माहिती

**"राजगोपालचारी उद्यानात वृक्षारोपण"**

**लोकनेता न्यूज नेटवर्क**

परभणी :- रमेश मुलगीर दि 05
शहरामधील उद्यान,शासकीय कार्यालयात वृक्षारोपण करण्यात येणार आहे महानगरपालिकेच्या वतीने शहरात ४०,००० झाडे लावणार येणार आहे अशी माहिती महापौर सय्यद इकबाल सय्यद खाजा यांनी दिली. परभणी शहर महानगरपालिकेच्या वतीने जागतिक पर्यावरण दिनानिमित्त राजगोपालचारी उद्यानात वृक्षारोपण करण्यात आले यावेळी महापौर सय्यद इकबाल सय्यद खाज, आयुक्त नितीन नार्वेकर,बसेरा बिल्डर्सचे शेख इब्राईम यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी उपायुक्त तुकाराम कदम, उद्यान विभाग प्रमुख मो. अथर माहिती जनसंपर्क अधिकारी राजकुमार जाधव , मुख्य स्वच्छता निरीक्षक श्रीकांत कुऱ्हा, रमेश चव्हाण, यांनी वृक्षारोपण केल्यानंतर शहरातील सर्व नागरिकांनी आपल्या घरा समोर दोन झाडे लावावे. प्रत्येक शाळा महाविद्यालय यांनी वृक्षारोपण करावे. तसेच शहरातील मुख्य रस्त्यावर वृक्षारोपण करण्यात येईल. शहरामधील उद्यानामध्ये वृक्षारोपण करण्यांत येणार आहे, शासकीय कार्यालयात वृक्षारोपण



करण्यात येणार आहे महानगरपालिकेच्या वतीने शहरात ४०,००० झाडे लावणार येणार आहे अशी माहिती महापौर सय्यद इकबाल सय्यद खाजा यांनी दिली. प्रत्येक कॉलोनीतील नागरिकांनी मनपाच्या वतीने नागरिकांना झाडे देण्यात येतील. तरी सर्व नागरिकांनी आपल्या



घरासमोर दोन झाडे लावावे व आपल्या परिसरात झाडे लावावे तसेच शहरातील वृक्षप्रेमी, एनजोओ, युवक युवती यांची झाडे लावावे असे आवाहन महापौर सय्यद इकबाल सय्यद खाजा आयुक्त नितीन नार्वेकर यांनी केले आहे.

# डीबी पथकाची कारवाई ;14 दिवसांची न्यायालयीन कोठडीत रवानगी

**दै. लोकनेता न्युज नेटवर्क**
देगलूर प्रतिनिधी/संतोष चिद्रावार लोणीकर

देगलूर पोलिसांनी अवैध गुटखा व सुगंधित तंबाखू वाहतुकी विरोधात धडक कारवाई करत सुमारे 89 हजार ३४० रुपयाचा प्रतिबंधित गुटखा व दुचाकी जप्त केली आहे. याप्रकरणी एका किराणा दुकानदाराला बुधवारी रात्री उशिरा अटक करण्यात आली गुरुवारी न्यायालयाने त्याला 14 दिवसाची न्यायालयीन कोटी सुनावली आहे.
पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार पोलीस निरीक्षक सूर्य मोहन बोलमवाड यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे शोध पथक अवैध धंद्यावर कारवाईसाठी या परिसरात गस्त घालत होते. दरम्यान सावरगाव थडी सांगवी उमर रोडवरील (पोतंगल तेलंगणा)
पुलाजवळ एका दुचाकीवरून प्रतिबंधित गुटखा वाहतूक होत असतानाची गोपनीय माहिती पोलिसांना मिळाली पोलिसांनी सापळा रचून एम एच सव्वीस सी - डब्ल्यू ०९८९ या क्रमांकाची दुचाकी आडविली तपासती दरम्यान दुचाकी वरील पांढऱ्या पोटामध्ये महाराष्ट्र शासनाने प्रतिबंधित केलेला सागर पान मसाला, विमल पान मसाला, सुगंधित तंबाखू आणि व्ही वन एस आर १ टोबॅको अशा गुटखा व तंबाखूजन्य पदार्थ आढळून आला या कारवाईत सुमारे 9 000 340 रुपयाचा प्रतिबंध गुटखा व तंबाखूजन्य पदार्थ तसेच ८० हजार रुपये किमतीची दुचाकी एकूण 89 हजार 340 रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.
पोलिसांनी दुचाकी चालक शरद संजय जाधव (वय 28 वर्षे किराणा दुकान राहणार मुजळगाव नवी आबादी ता. देगलूर) याला ताब्यात घेतली चौकशी आणि ती आरोपीने हा म** तेलंगणातून पतंगल मार्ग खरेदी करून आणल्याची खबर दिली आहे याप्रकरणी डीबी कर्मचारी मोहम्मद इमरान यांनी दिलेल्या फिर्यादीवरून आरोपी विरुद्ध भारतीय न्याय संहिता २०२३ मधील कलम १२३,२७४,२७५,२२३ तसेच अन्य सुरक्षा व मानके कायदा २००६ मधील विविध कलमाने देगलूर पोलीस ठाण्यात गुन्हा क्रमांक २७९/२०२६ दाखल करण्यात आला आहे. या कारवाईत गुन्हे शोध पथकातील पोलीस उपनिरीक्षक महाजन मैसंवाड, पोहे कॉ. चंद्रकांत भाग्यवंत, पोलीस कर्मचारी वैजनाथ मोटरगे, मोहम्मद इमरान यांनी सहभाग घेतला. पुढील तपास मैसंवाद हे करीत आहेत.
आरोपी शरद संजय जाधव याला प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी धर्माबाद यांच्या न्यायालयात गुरुवारी दुपारनंतर हजर करण्यात आले. सोनवणे अंत्य न्यायालयाने आरोपीस 14 दिवसांची न्यायालयीन कोठडी सुनावली असल्याची माहिती पोलीस सूत्रांनी दिली आहे.

# मानवत तालुक्यातील 41 ग्रामपंचायतच्या आरक्षण सोडतीचा कार्यक्रम जाहीर

**"तहसीलदार पांडुरंग माचेवाड यांनी घेतली कर्मचारी अधिकारी यांची बैठक".**

**दैनिक लोकनेता न्यूज़ नेटवर्क**
परभणी/प्रतिनिधी:- रमेश मुलगीर

महाराष्ट्र राज्य निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार मानवत तालुक्यातील डिसेंबर 2026 अखेर मुदत संपणाऱ्या ग्रामपंचायतीतील आरक्षण कार्यक्रम जाहीर करून आरक्षण काढण्यासाठी 41 ग्रामपंचायतच्या प्राधिकृत अधिकारी व ग्रामपंचायत अधिकारी ग्राम महसूल अधिकारी यांची तहसील कार्यालयामध्ये बैठक घेऊन त्यांना ग्रामपंचायत आरक्षण या बाबतीत सखोल मार्गदर्शन करून योग्य त्या सूचना केल्या. यावेळी ग्रामपंचायतच्या एकूण सदस्य संख्येच्या पन्नास टक्के आरक्षण, नामाप्र चे 27 टक्के आरक्षण, एससी एसटी व महिला आरक्षण काढण्यासंदर्भात शासकीय नियमाचे योग्य



ते मार्गदर्शन केले. कोणत्याही ग्रामपंचायत मध्ये 50% पेक्षा जास्त आरक्षण एससी एसटी नामाप्र च्या आरक्षणासह जाणार नाही याबाबत सर्व आदेशित कर्मचारी यांनी विशेष लक्ष देण्याचे सुचित केले .यावेळी राज्य निवडणूक आयोगाकडून आलेले वेळापत्रकही सांगितले. आरक्षण सोडतचा कार्यक्रम पुढील प्रमाणे. आरक्षणाची सोडत काढण्याकरिता विशेष ग्रामसभेचे सूचना देणे ८ जून विशेष ग्रामसभा बोलून आरक्षण सोडत काढणे 12 जुन , प्रभाग निहाय आरक्षण प्रारूप अधिसूचनेला जिल्हाधिकारी यांनी मान्यता देणे 17 जून , प्रभाग निहाय आरक्षणाचे प्रारूप प्रसिद्ध करणे 19 जून , हरकती व सूत्र दाखल करणे 19 जून ते 25 जून ,उपविभागीय अधिकारी यांनी प्राप्त हरकती विचारात घेऊन अभिप्राय देणे तीन जुलै , अंतिम अधिसूचनेस जिल्हाधिकारी यांनी मान्यता देणे आठ जुलै व अंतिम प्रभाग रचनेला नमुना व्यापक प्रसिद्धी देणे 10 जून. 41 ग्रामपंचायतीचे आरक्षण काढण्यासाठी एकूण 14 प्राधिकृत अधिकारी त्यासोबतच संबंधित ग्रामपंचायतचे ग्राम पंचायत अधिकारी ग्राम महसूल अधिकारी यांच्या नियुक्तीचे आदेश तहसील कार्यालयाकडून काढण्यात आले. तालुक्यामध्ये दिनांक 9, 10, 11 जून रोजी विशेष ग्रामसभा घेण्याकरिता वेळापत्रक तयार केले आहे. सदरील कामामध्ये कोणीही टाळाटाळ करणार नाही याचे काळजी सर्व संबंधितानी घेण्याच्या सूचना तहसीलदार मानवत यांनी केल्या. यावेळी निवडणूक विभागाचे नायब तहसीलदार संजय खिल्लारे संतोष वायकोस ,बापू रासवे, संगणक ऑपरेटर राहुल खाडे हजर होते. प्राधिकृत अधिकारी म्हणून सर्व मंडळ अधिकारी पंचायत समिती मधील विस्तार धिकारी, कृषी विभागाचे अधिकारी इ यांच्या नियुक्ती केल्या

This Newspaper is printed by owner, printer, publisher editor Dyaneshwar Bhausaheb Mundhe at New Geeta Printing Press Mirkala Ta Gevrai District Beed 431127 and published at Dainik Lokneta Office Ho.No. 50, Main Road Mirakala Ta Gevarai District Beed 431127 (Maharashtra) Mo no 7499615933

हे पत्रक,मालक,मुद्रक, प्रकाशक संपादक ज्ञानेश्वर भाऊसाहेब मुंढे यांनी न्यू गीता प्रिंटिंग प्रेस मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ येथे छापून दैनिक लोकनेता कार्यालय हो.नं ५०,मेन रोड मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले आहे. मो.नं ७४९९६१५९३३ .या अंकात प्रकाशित झालेल्या बातम्या व लेखा या मधून व्यक्त झालेल्या मताशी संपादक सहमत असतीलच असे नाही (वाद विवाद गेवराई न्यायालयाअंतर्गत)